दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

## इराण होर्मुझमधील जहाजांकडून टोल वसूल करणार, संसदेची मंजुरी

तेहरान दि.२४ (वृत्तसंस्था)- इराणच्या संसदेने होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांकडून टोल म्हणजेच शुल्क घेण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. इराणच्या मेहर वृत्तसंस्थेनुसार, ज्या देशांच्या जहाजांना होर्मुझमधून जाण्याची परवानगी असेल, त्यांच्याकडून सागरी सेवांच्या बदल्यात शुल्क आकारले जाईल.

इराणच्या संसदेच्या राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरण समितीचे प्रवक्ते हसन काशकवी यांच्या मते, शुल्काच्या बदल्यात सागरी सेवा, सुरक्षा आणि विमा यांसारख्या सुविधा दिल्या जातील.

याव्यतिरिक्त, पर्यावरण संबंधित सेवा आणि विशेष परिस्थितीत इंधन देखील पुरवले जाईल. भुगतान इराणी रियालमध्ये किंवा इराणच्या पसंतीच्या इतर कोणत्याही चलनात करता येईल.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझ सामुद्रधुनीला 'न्यू यूएस टेरिटरी' म्हणजेच नवीन अमेरिकन प्रदेश असल्याचे सांगितले आहे. १८ ऑगस्ट रोजी त्यांनी पहिल्यांदा होर्मुझवर अमेरिकेचे नियंत्रण असल्याचे म्हटले होते. त्यानंतर त्यांनी रविवारी पुन्हा असेच एक चित्र शेअर केले, ज्यात होर्मुझला अमेरिकन प्रदेश म्हणून दाखवले होते.

(वर्ष ६५ वे अंक २१४) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.२५ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

# अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात नवजात शिशू कक्षात भीषण आग, तीन बालकांचा होरपळून मृत्यू



अमरावती दि.२४ (प्रतिनिधी)- अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयात सोमवारी पहाटे भीषण आग लागली. येथील नवजात शिशु कक्षात ही आग लागली. त्यामध्ये तीन लहान बालकांचा धुरामुळे गुदमरुन मृत्यू झाला आहे. तर या कक्षात असलेल्या सहा अर्भकांवर सुपर स्पेशालिटी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, सोमवारी पहाटे साडेतीन वाजता नवजात शिशु अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटरमध्ये अचानक स्फोट झाला. त्यामुळे लागलेली आग अतिदक्षता विभागात वेगाने पसरली. मात्र, रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी या कक्षातील बालकांना वेगाने बाहेर काढले. अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावर एकूण तीन नवजात शिशु अतिदक्षता कक्ष आहेत. या तीन कक्षांमध्ये प्रत्येकी १३ अशी मिळून ३९ नवजात बालकांवर उपचार घेण्याची क्षमता आहे. यापैकी एका कक्षात आग लागली. या कक्षात एकूण ९ बालके होती. आग लागल्याचे लक्षात येताच ड्युटीवर असलेल्या डॉक्टर / नर्सेस आणि कर्मचाऱ्यांनी या कक्षातील लहान बाळांना बाहेर काढले. मात्र, दुर्दैवाने तीन बालकांचा धुरामुळे गुदमरुन मृत्यू झाला. अवघ्या वर्षभरापूर्वी हा नवजात शिशु अतिदक्षता विभाग सुरु करण्यात आला होता. मग आग लागल्यानंतर रुग्णालयातील अग्निशामक यंत्रणा का कार्यान्वित झाली नाही, असा सवाल उपस्थित केला जात आहे. नवजात शिशू अतिदक्षता विभागात (एसएनसीयू) कमी दिवसांचे (प्री-मॅच्युअर), कमी वजनाची आणि गंभीर अवस्थेतील बालकांवर उपचार केले जातात. उपचार सुरु असलेल्या काही बालकांच्या हाताला आणि पायाला भाजल्याची माहिती आहे. त्यांच्यावर सध्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. व्हेंटिलेटरमध्ये स्फोट कशामुळे झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेनंतर आजुबाजूच्या कक्षातील बालकांनाही सुपरस्पेशालिटी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. आग लागल्यानंतर रुग्णालयातील अग्नीरोधक यंत्रणा का कार्यान्वित झाली नाही, असा सवाल विचारला जात आहे. आग लागल्यानंतर या कक्षात तैनात असलेले कर्मचारी कुठे गेले होते, याबद्दलही प्रश्न उपस्थित झाले आहेत. या घटनेमुळे रुग्णालयातील आपातकालीन सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या सगळ्यावर आता रुग्णालय प्रशासन काय स्पष्टीकरण देणार, हे बघावे लागेल. मात्र, या सगळ्यामुळे नाहक तीन चिमुरड्या जीवांना प्राण गमवावे लागल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

### आरोग्यमंत्र्यांकडून पाहणी; सात सदस्यीय चौकशी समिती गठीत

अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात आग लागून तीन नवजात बालकांचा झालेला मृत्यू ही अत्यंत वेदना देणारी घटना आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी आरोग्य विभागाच्या आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यांची समिती नेमण्यात आली असून येत्या आठ दिवसांत ही समिती आपला अहवाल सादर करणार आहे. निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी किंवा कंत्राटदाराला पाठीशी घातले जाणार नाही, जे दोषी आढळतील, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असे राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले आहे. प्रकाश आबिटकर यांनी आज जिल्हा स्त्री रुग्णालयाची पाहणी केली. त्यानंतर पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. आबिटकर म्हणाले, संबंधित व्हेंटिलेटर वॉरंटी काळात होते, तपासणीही झाली होती, तरीही ही दुर्घटना कशी घडली? याची तांत्रिक तपासणी केली जाईल. आगीच्या वेळी सायरन वाजले का नाही, स्प्रिंकलर्स आणि अग्निसुरक्षा उपकरणे सुरू होते का, याचीही पडताळणी केली जात आहे. उपकरण पुरवणाऱ्या कंपन्या आणि कंत्राटदारांची प्रक्रिया नियमांनुसार झाली होती का, हे तपासले जाईल. निकृष्ट दर्जाची उपकरणे देणाऱ्या आणि हलगर्जीपणा करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकले जाईल. प्रकाश आबिटकर म्हणाले, आरोग्य विभागाचे आयुक्त संजय काटकर यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करणार आहे. समितीत 'एम्स'चे प्रतिनिधी, 'डीएमईआर'चे तज्ज्ञ, महावितरणचे मुख्य विद्युत अभियंता आणि अग्निसुरक्षा तज्ज्ञांचा समावेश राहणार आहे. ही समिती संपूर्ण तांत्रिक बाबी, मशिनरी आणि यंत्रणेतील त्रुटींची पारदर्शकपणे तपासणी करून ८ दिवसांत शासनाला सविस्तर अहवाल सादर करेल. अहवालात ज्यांच्यावर ठपका ठेवला जाईल किंवा ज्यांचा निष्काळजीपणा समोर येईल, त्यांच्यावर तत्काळ कठोर कारवाई केली जाईल.

### मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाखाची मदत-मुख्यमंत्री

अमरावतीमधील जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागात घडलेल्या आगीच्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे. तसेच या घटनेला जबाबदार असणाऱ्यांवर अतिशय कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला आहे.

या घटनेतील दोषींवर कठोरतील कठोर कारवाई करण्यात येईल. आरोग्य मंत्री आणि सचिव दोघांनाही आजच अमरावती येथे भेट देण्यास सांगण्यात आले आहे. मृतांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारकडून ५ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात येईल. जखमी बालकांवर उपचार शासकीय खर्चाने करण्याचे निर्देशही अमरावती जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. सुदैवाने या घटनेत ३६ बालकांना सुखरूप वाचवण्यात यश मिळाले.

## राज्य सरकारकडून शेतकरी कर्जमाफीचा दुसरा हप्ता जारी

### ६,३६,०३६ शेतकऱ्यांना ५०८६ कोटी रुपये वितरित

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- महायुती सरकारनं राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून सावरण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. या योजनेतील दुसरा हप्ता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत वितरीत करण्यात आला. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतून कर्जमाफीच्या दुसऱ्या हप्त्याच्या निधीचं वितरण करण्यात आलं आहे. दुसऱ्या टप्प्यात ५०८६ कोटी रुपये वर्ग करत ६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आला आहे.

महायुती सरकारनं पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केल्यानंतर पहिल्या टप्प्यात ७ ऑगस्टला ५०२९ कोटी वितरीत करत ६ लाख २२ हजार २०७ शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात आली होती. आज दुसऱ्या टप्प्यात ६ लाख ३६ हजार ३६ पात्र शेतकऱ्यांना ५०८६ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आला आहे.

राज्य सरकारकडून कर्जमाफी योजनेसाठी टप्प्या टप्प्यानं निधी वितरीत केला जात आहे. या कर्जमाफीमध्ये साधारणपणे ३२ लाखांहून अधिक शेतकऱ्यांचं कर्ज माफ केलं जाणार आहे. तर, २३ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान दिलं जाणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ ५६ लाख शेतकऱ्यांना होणं अपेक्षित आहे.

राज्य सरकाकडून आतापर्यंत दोन टप्प्यात १०११५ कोटी रुपयांच्या कर्जमुक्तीचा लाभ १२ लाख ५८ हजार २४३ शेतकऱ्यांना देण्यात आला आहे. कर्जमाफीतील पात्र शेतकऱ्यांना लाभ वितरणाची प्रक्रिया सुरू असून लाभार्थींची संख्या सातत्याने अद्ययावत होत असल्याची माहिती देण्यात आली आहे. योजनेची संपूर्ण प्रक्रिया अतिशय पारदर्शक असून, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत नियंत्रित केली जात आहे, अशी माहिती देखील देण्यात आली आहे.

## आता मागे हटणार नाही, २९ ऑगस्टला आंदोलन होणारच; जरांगे पाटलांचा एल्गार



जालना दि.२४ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन पुन्हा एकदा राज्यातील वातावरण तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटीत आंदोलनाला सुरुवात करणार आहेत. दरम्यान, त्यापूर्वी आज सरकारच्या शिष्टमंडळाने यामध्ये मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री शंभूराज देसाई, मंत्री उदय सामंत यांनी जरांगे पाटील यांची भेट घेतली. या भेटीनंतर मनोज जरांगे पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आता मागे हटणार नाही. २९ ऑगस्टला आंदोलन होणारच असल्याची माहिती मनोज जरांगेंनी दिली आहे. २९ ऑगस्टपासून मनोज जरांगे पाटील यांचे आंतरवाली सराटीत आंदोलन होणार आहे. ज्या नोंदी शोधल्या आहेत, त्या सर्वांची प्रमाणपत्र (पान ४ वर)

## साखरेची टंचाईच नसेल तर अचानक दरवाढ होण्याचे कारण काय?

### देशात मोठा साखर घोटाळा? राजू शेट्टींचं मोदींना पत्र, जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रत्येक गोडाऊन तपासण्याची मागणी

कोल्हापूर दि.२४ (प्रतिनिधी)- देशभरात वाढलेल्या साखरेच्या दरावरुन शेतकरी नेतेही आक्रमक झाले आहेत. कारण, एकीकडे दरवाढीने सर्वसामान्य ग्राहक संतापला असून दुसरीकडे दरवाढीचा शेतकऱ्यांना फायदा होत नसल्याने शेतकरीही चिडले आहेत. साखरेचं दर वाढले आहेत, त्याचा फायदा शेतकऱ्यांना झाला असता तर आम्हाला आनंद झाला असता. केंद्र सरकारने १० लक्ष टन साखर आयात करण्याचा निर्णय घेतला, आता आयात करण्यात आलेली साखर ऑक्टोबरमध्ये येणार, त्याच काळात साखर करखाने सुरू होणार, त्यामुळे दर कोसळणार, असे म्हणत केंद्र सरकारच्या धोरणावर शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी नाराजी दर्शवली आहे. राजू शेट्टी यांनी साखरेच्या वाढलेल्या दरासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्रही लिहिले आहे.

महिन्याला साखरेचा २२ लाख टन कोटा दिला जातो, सरकारने दिलेल्या ४५ ते ४८ लाख टन साखरेचा हिशोब लागत नाही. रिकव्हरी चोरून, साठवून ठेवलेली साखर चढ्या दराने विकायची असे धोरण दिसत आहे. राज्यातील काही साखर कारखान्यानी टेंडर काढलं, पण साखर विकली नाही. त्यामुळे, साखरेचा भाव वाढवायचा असे आधीच ठरवलेलं होत,देशात साखर घोटाळा झाला असून सरकारचे नियंत्रण नसल्याचा आरोपही राजू शेट्टींनी केला आहे. सरकारने जर नियंत्रण ठेवले असत घोडे बाजार झाला नसता, सण आहेत म्हणून दर वाढवायचा. सरकारने दिलेल्या आकडेवारीवरुन साखर कमी पडायची आवश्यकता नाही. पुढच्या वर्षी ३०० लाख टन साखर उत्पादित होईल. मी प्रधानमंत्री यांना पत्र लिहलं आहे. केवळ साखर मिळत नाही म्हणून लोक अस्वस्थ झाले नाहीत, साखरेची किंमतही वाढली आहे. त्यामुळे, साखरेचे गोडाऊन तपासले पाहिजे, कागदावर अन् गोडाऊनची तपासणी झाली पाहिजे.

साखरेचे दर वाढवून काही लोक पैसा कमवत आहेत याची सखोल चौकशी व्हावी, खरोखरच साखरेची टंचाई असती तर महाराष्ट्रच काय देशात कुठेही साखर मिळत नाही म्हणून लोक अस्वस्थ झालेले पाहायला मिळत नाहीत. साखर फक्त महाग झाली आहे. टंचाईच नसेल तर अचानक दरवाढ व्हायचं कारण काय? या दरवाढीचा शोध घ्यायचा असेल तर प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी खासगी व्यापाऱ्यांचे आणि साखर कारखानदारांचे गोडाऊन तपासावेत, कागदावर किती स्टॉक आहे आणि गोडाऊनमध्ये किती आहे. याची चौकशी झाली पाहिजे आणि रेकॉर्डवर नसलेली साखर जप्त केली, पाहिजे अशी मागणी राजू शेट्टींनी केली आहे.

## कांदिवलीत मराठी रिक्षाचालकाला अमराठी रिक्षाचालकांची मारहाण

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- मराठी भाषेची सक्ती करण्यात आल्यानंतर मुंबईत अमराठी रिक्षा चालक आक्रमक झाले आहेत. तर, कांदिवलीत मराठी रिक्षा चालकाला परप्रांतीय रिक्षा चालकांनी मारहाण केल्याची घटना उघडकीस आलीय. परप्रांतीय रिक्षा चालकांनी काही ठिकाणी बंद पुकारला असून, भोजपुरी, हिंदी बोलू पण मराठी बोलणार नाही, अशी भूमिका मांडली तसेच, परिवहन मंत्री सरनाईक आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी केली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मुजोरी केल्यास मोडून काढू, असा इशारा दिला आहे.

कांदिवलीत मराठी रिक्षा चालकाला परप्रांतीय रिक्षा चालकांनी मारहाण केल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी मनसे आक्रमक झाली व एका परप्रांतीय रिक्षा चालकाला पकडून पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. माराहण प्रकरणी कांदिवली पोलिसांत तक्रार देखील दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. ३ ते ४ परप्रांतीय रिक्षा चालकांनी मारहाण करुन रिक्षाची मोडतोड केल्याचा आरोप मराठी रिक्षा चालकाने केला आहे.

दुसरीकडे मराठी सक्तीच्या विषयावरुन अमराठी रिक्षा (पान ४ वर)

## राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढणार; मराठवाडा अद्यापही तहानलेलाच

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने घेतलेल्या विश्रांतीनंतर आता पुन्हा एकदा पावसाचे वातावरण तयार झाले आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या हवामान प्रणालीमुळे महाराष्ट्रातील काही भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. विशेषतः विदर्भ, कोकण-गोवा तसेच पुणे आणि सातारा जिल्ह्यांच्या घाटमाथ्यावर जोरदार पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज आहे. विदर्भातील काही जिल्ह्यांना पावसाचा इशाराही देण्यात आला आहे.

राज्यात मान्सून दाखल होऊन अडीच महिन्यांहून अधिक कालावधी उलटला आहे. मात्र, अनेक भागांत अद्यापही अपेक्षित पाऊस झालेला नाही. काही ठिकाणी पावसाने दीर्घ विश्रांती घेतल्याने खरीप पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची चिंता शेतकऱ्यांमध्ये आहे. विशेषतः मराठवाड्यातील अनेक भागांत दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. अशा परिस्थितीत पुढील काही दिवसांत होणारा पाऊस शेतीसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरातील हवामान प्रणाली सक्रिय झाल्याने महाराष्ट्रासह देशातील काही भागांत मान्सून पुन्हा सक्रिय होण्यास पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे राज्याच्या काही भागांत पावसाच्या सरींचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

(पान ४ वर)

## कुंभमेळ्याची ०.१टक्के रक्कम दिली असती, तरी मराठी शाळा वाचल्या असत्या-न्यायमूर्ती पी. बी. वराळे

धुळे दि.२४ (प्रतिनिधी)- नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांवर सरकारकडून हजारो कोटी रुपयांची उधळपट्टी केली जात असताना, दुसरीकडे निधीअभावी राज्यातील मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत, यावर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न बी. वराळे यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. 'कुंभमेळ्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या हजारो कोटी रुपयांपैकी केवळ ०.१ टक्के रक्कम जरी शिक्षणावर खर्च केली असती, तरी राज्यातील बंद पडलेल्या १०० ते १२५ मराठी माध्यमाच्या शाळा वाचवता आल्या असत्या,' अशा शब्दांत त्यांनी सरकारला आरसा दाखवला आहे.

धुळे जिल्ह्यातील एका शाळेत 'स्मार्ट क्लास'च्या उद्घाटन प्रसंगी न्यायमूर्ती वराळे बोलत होते. याच शाळेत त्यांनी शालेय शिक्षण घेतले होते. यावेळी त्यांनी शिक्षण व्यवस्थेची सद्य:स्थिती, मराठी भाषेचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांवर सविस्तर भाष्य केले. (पान ४ वर)

## कॉक्रोच जनता पार्टीचा दिल्लीत ५ सप्टेंबरला शांतता मोर्चा, आंदोलकांवरचे गुन्हे मागे घेतले नसल्याने निर्णय

नवी दिल्ली दि.२४ (वृत्तसंस्था)- कॉक्रोच जनता पार्टी अर्थात सीजेपीने येत्या ५ सप्टेंबरला दिल्लीत शांतता मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. तसंच देशभरात शांतता मोर्चा काढण्याचं आवाहनही तरुणाईला केलं आहे. दिल्लीत येत्या ५ सप्टेंबरला शांतता मोर्चा काढण्यात येईल. जुलै महिन्यात जे आंदोलन मागे घेण्यात आलं त्यातली एक अट सरकारने अद्याप पूर्ण केलेली नाही. त्यामुळे सीजेपीने हा निर्णय जाहीर केला आहे. सगळ्या आंदोलकांवरचे गुन्हे मागे घेतले जातील ही देखील अट सरकारने मान्य केली होती. पण अद्याप हे गुन्हे मागे घेण्यात आलेले नाहीत. त्यामुळेच दिल्लीत आता शांतात मोर्चा काढला जाईल असं सीजेपीने जाहीर केलं आहे.

कॉक्रोच जनता पार्टीने हे म्हटलं आहे की येत्या ५ सप्टेंबरला आम्ही दिल्लीत शांतता मोर्चा काढणार आहोत. अशा शांतता आंदोलनाचं देशभरात आयोजन केलं जावं असंही आवाहन त्यांनी केलं आहे. केंद्र सरकारने २५ जुलैला जी आश्वासनं दिली होती त्यानंतर आम्ही आमचं जंतर-मंतरवरचं आंदोलन मागे घेतलं होतं. मात्र अजूनही आंदोलकांवरचे गुन्हे मागे घेण्यात आलेले नाहीत. त्यामुळे आम्ही येत्या ५ सप्टेंबरला शांतता मोर्चाचं आयोजन केलं आहे. इंडिया गेट या ठिकाणाहून हे आंदोलन सुरु होईल. नवी दिल्लीच्या पोलीस मुख्यालयापर्यंत आमचा मोर्चा असेल असं सीजेपीने स्पष्ट केलं आहे. नीट परीक्षा देणारे विद्यार्थी, (पान ४ वर)

## काँग्रेस आणि मविआकडून महिला आरक्षणावरून बुद्धीभेद-मुख्यमंत्री

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून फडणवीस यांनी काँग्रेस आणि महाविकास आघाडीवर निशाणा साधला. "काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे नेते सातत्याने बुद्धीभेद करण्याचा प्रयत्न करत आहेत," असा आरोप त्यांनी केला.

२०२३ मध्ये महिला आरक्षण विधेयक मंजूर झाले असून, त्यावेळी विधेयकाच्या अंमलबजावणीसाठी मतदारसंघ पुनर्रचना आणि जनगणनेशी संबंधित बाबींचा विचार करण्यात आला होता, असे फडणवीस यांनी सांगितले. कोविडमुळे जनगणना पुढे गेल्याने या प्रक्रियेलाही विलंब झाला, असे त्यांनी स्पष्ट केले.

२०२९ मध्ये महिलांना आरक्षण देण्याचा मोदी सरकारचा निर्धार असून, कोणत्याही परिस्थितीत महिलांना आरक्षण मिळेल, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला. विरोधकांनी यापूर्वी मतदारसंघ पुनर्रचनेला पाठिंबा दिला होता, असा दावा करत महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर काँग्रेसकडून संभ्रम निर्माण केला जात असल्याची टीका त्यांनी केली.

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या पारितोषिकांच्या रकमेत भरीव वाढ

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडू व त्यांचे मार्गदर्शक यांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्याच्या योजनेत नॅशनल गेम्सह, खेलो इंडिया तसेच दिव्यांगाच्या आणखी सहा स्पर्धांचा समावेश करण्यास तसेच रोख पारितोषिक योजनेत सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची कठोर मेहनत, समर्पण आणि त्यांच्या यशात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या क्रीडा मार्गदर्शकांच्या योगदानाचा यथोचित सन्मान करण्याच्या दृष्टीने ही पारितोषिक योजना सुधारीत करण्यात आली आहे. यात आता केंद्र शासन आणि इतर क्रीडा-प्रगत राज्यांच्या धर्तीवर रोख पारितोषिक देण्यात येणार आहे.

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धासाठीच्या रोख पारितोषिकात भरीव वाढ करण्यात आली असून सुवर्ण पदकासाठी सात लाख (पूर्वी ५ लाख), रौप्यसाठी पाच लाख (पूर्वी ३ लाख) तर कांस्यसाठी तीन लाख (पूर्वी दीड लाख) अशी वाढ करण्यात आली आहे. वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्ससाठी सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकासाठी अनुक्रमे १० लाख, ७ लाख, ५ लाख रुपये तर नॅशनल गेम्ससाठी अनुक्रम ७ लाख,५ लाख, ३ लाख रुपये आणि खेलो इंडियातील पदकासाठी अनुक्रम ३ लाख,२ लाख,१लाख रुपये अशी तरतूद करण्यात आली आहे.

नागपूर येथे लता मंगेशकर विद्यापीठ तर अहिल्यानगर येथे डॉ. बाळासाहेब विखे पाटील विद्यापीठ अशी दोन खासगी आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापनेस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

नागपूर येथे व्ही.एस.पी.एम ॲकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन या संस्थेने खासगी आरोग्य विद्यापीठ स्थापनेचा प्रस्ताव दिला होता. या विद्यापीठात वैद्यकशास्त्र, दंतवैद्यक, फिजिओथेरपी आणि नर्सिंग विद्याशाखांमधील पदवी, पदव्युत्तर आणि सुपर स्पेशॅलिटी अभ्यासक्रम सुरु होणार. (पान ४ वर)

## ज्येष्ठ मराठी व्याकरणतज्ज्ञ प्रा. यास्मिन शेख यांचे निधन

पुणे दि.२४ (प्रतिनिधी)- मराठी भाषा, व्याकरण आणि भाषाशास्त्राच्या क्षेत्रातील ज्येष्ठ अभ्यासक, लेखिका आणि शिक्षिका प्रा. यास्मिन शेख यांचे सोमवारी (२४ ऑगस्ट) पुण्यात निधन झाले. त्या १०१ वर्षांच्या होत्या. पुण्यातील एका वृद्धाश्रमात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने मराठी भाषा, साहित्य आणि व्याकरणाच्या क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. प्रा. यास्मिन शेख यांनी आयुष्याची अनेक दशके मराठी भाषेच्या अभ्यासाला आणि अध्यापनाला वाहिली. क्लिष्ट व्याकरणाचे नियम अत्यंत सोप्या आणि सहज भाषेत समजावून सांगण्याची त्यांची हातोटी विशेष प्रसिद्ध होती. विद्यार्थी, शिक्षक, लेखक, संपादक तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्या मार्गदर्शक ठरल्या.

यास्मिन शेख यांचा जन्म २१ जून १९२५ रोजी झाला. त्यांचे जन्मनाव जेरुषा रुबेन होते. त्या जन्माने ज्यू कुटुंबातील होत्या. वडिलांच्या सरकारी नोकरीमुळे बालपणात त्यांना विविध ठिकाणी राहण्याची संधी मिळाली. या काळातच त्यांच्या मनात शिक्षण आणि भाषेची आवड निर्माण झाली.

# शहिद राजगुरू महान क्रांतिकारक

महाराष्ट्रातील पुणे येथील खेड गावांमध्ये (आताचे राजगुरू नगर) पुणे २४ ऑगस्ट १९०८ ला शिवराम हरी राजगुरू नावाचा महान क्रांतिकारक जन्माला आला.जनुकाय या पृथ्वीवर लखलखत्या सुर्यप्रकाशाचा जन्म झाला की काय असे सर्वांना भासु लागले. कारण जन्मतःच त्यांच्या चेहऱ्यावर क्रांतीची ज्वाला धगधगत होती आणि भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात एक तेजोमय लखलखता प्रकाश प्रगट झाला व क्रांतीची मशाल संपूर्ण भारतात सुर्या प्रमाणे प्रज्वलीत झाली.राजगुरूनी संस्कृत भाषेत शिक्षण घेतले.लघुसिध्दांत कौमुदीचा अभ्यास केला. त्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी आणि कन्नड भाषा चांगलीच अवगत होती.क्रांतीकारी विचारसरणीचे चंद्रशेखर आझाद आणि लोकमान्य टिळक यांच्या विचारांच्या प्रभावामुळे अल्पवयातच राजगुरू इंग्रजाची घृणा करू लागले व स्वतंत्र लढ्यात उडी घेतली. राजगुरू हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशनचे सदस्य होते.यानंतर चंद्रशेखर आझाद, भगतसिंग,सुखदेव थापर घनीष्ठ मित्रं झाले आणि क्रांतीला नवी दिशा व चालना देवून क्रांतीची ज्वाला प्रज्वलित केली.आज शहिदांच्या पुंण्यायीनेच देशाची १४५ कोटी जनता मोकळा स्वास घेत आहे.अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष यांच्या अथक परिश्रमाने,प्रयत्नाने व बलीदानाने १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.क्रांतिकारकांनी कोणत्याही गोष्टीची व आपल्या परिवाराची पर्वा न करता इंग्रजांना सडेतोड उत्तर देऊन स्वतंत्र भारताची मशाल १९४७ ला प्रज्वलीत केली. १९२८ ला भारतातील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले. त्यावेळी सायमन कमिशन नावाचे वादळ रोखण्यासाठी लाला लजपतराय यांनी पुढाकार घेऊन 'सायमन परत जा'च्या घोषणांनी संपूर्ण भारत एकवटला.हि बाब सायमन कमिशनचे अधिकारी सँडर्स यांना पचली नाही.लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने प्रदर्शनकारी जमा झाले.यामुळे सायमन कमिशनची घाबरगुंडी उडाली व जमाव पांगवण्यासाठी सँडर्स यांनी लाठीचार्जचा आदेश दिला. यात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच १७ डिसेंबर १९२८ ला त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण भारत शोकाकुल झाला.हे दुःख राजगुरू,भगतसिंह आणि सुखदेव यांना पहावले नाही.त्यामुळे क्रांतीकारकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी कंबर कसली व लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा अधिकारी सँडर्स याला ठार मारण्याची योजना आखली.लाला लजपतराय यांच्या पहिल्या मासिक श्राध्दाच्या दिवशी राजगुरू,भगतसिंग,आणि सुखदेव हे तिघेही वेष बदलुन जॉन सँडर्स यांच्या निवासस्थानी गेले.सँडर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिले.संकेत मिळताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाचवेळी गोळ्या झाडून सँडर्सला जागीच ठार केले व तेथुन पलायन केले. यामुळे इंग्रज आगबबुला झाले व इंग्रजांनी तिघांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.बरेच दिवस इंग्रजांना हुलकावणी देत तिन्ही क्रांतिकारक भूमिगत राहिले. परंतु फितुरीमुळे ते पकडले गेले. शेवटी २३ मार्च १९३१ ला भारतमातेच्या तिन्ही सुपुत्रांना इंग्रजांनी फाशी दिली.यामुळे संपूर्ण भारत स्तब्ध होऊन सर्वत्र शोककळा पसरली.भारत स्वतंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या तिन्ही सुपुत्रांना कोन्हीही विसरणार नाही.'जो पर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत या शहिदांना कोन्हिही विसरणार नाही'. राजगुरू,भगतसिंग आणि सुखदेव यांचे बलीदान पाहून १४५ कोटी जनतेच्या तळपायाची आग आजही मस्तकात जाते. परंतु ९५ टक्के राजकीय पुढारी शहिदांना विसरल्याचे दिसून येते. कारण ९५ टक्के राजकीय पुढारी आज देशाच्या विकासापेक्षा स्वत:च्या विकासाकडे जास्त लक्ष देताना दिसतात.इंग्रजांनी भारताला लुटले ही बाब सत्य आहे.परंतु देशातील भ्रष्ट राजकीय पुढाऱ्यांनी देशाला हजारोपटीने लुटले आहे त्यामुळे देशात अनेक गंभीर समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.यामुळे आज देशात मुलभूत सुविधांचा अभाव, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, कुपोषण, महागडे शिक्षण इत्यादींचा सामना आज देशातील १४५ कोटी जनतेला करावा लागतो. राजकीय पुढाऱ्यांनो याद राखा जोपर्यंत तुम्ही देशविकासासाठी, जनतेच्या हितासाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी संपूर्ण ताकद लावणार नाही तोपर्यंत शहिदांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही. क्रांतिकारक,शहिद अल्पवयात हसत-हसत फासावर का चढले या मागचा त्यांचा एकच उद्देश होता.तो म्हणजे मातृभुमिची रक्षाकरून सर्वसामान्यांना न्याय मिळावा व भारत स्वतंत्र होवून सुख शांती निर्माण व्हावी व सुजलाम सुफलाम व्हावा.परंतु आजचा राजकीय पुढारी असा झाला आहे की 'लोका सांगे ग्यान व स्वत: कोरडे पाषाण' यामुळेच या कृषी प्रधान देशात मुठभर राजकीय पुढारी वाममार्गाने पैसा कमवुन करोडपती व अरबोपती झाल्याचे दिसून येते.त्याचबरोबर देशातील चार हजार आजी-माजी लोकप्रतिनिधींवर गुन्हेगारीचे खटले प्रलंबित आहेत तरी ते लोकप्रतिनिधी आहेत हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.आजच्या लोकप्रतिनिधींच्या घाणेरड्या राजकरणामुळे जेन-झी आणि जेन-अल्फा आक्रमक झाल्याचे दिसून येते.देशातील वाढत्या भ्रष्टाचारामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व गरीब हा गरीबीच्या खाईत गुदमरत आहे.या संपूर्ण बाबींची जान राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे व देशसेवा आणि जनसेवा याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांची शहीदांना खरी श्रद्धांजली मानल्या जाईल. राजकीय पुढाऱ्यांनी फक्त एक दिवस शहिदांचे अनुकरण करून लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी या पदाला कलंकित न करता यांचा योग्य उपयोग करून जनसेवा केली पाहिजे. तेंव्हाच शहिद राजगुरू यांना खरी श्रद्धांजली ठरेल व शहिदांच्या आत्म्याला शांती मिळेल.संपुर्ण देश शहिदांना आपली आदरांजली अर्पण करीत आहे.परंतु शहिदांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची जाण मुख्यत्वेकरुन राजकीय पुढाऱ्यांनी ठेवण्याची गरज आहे.कारण राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष देशसेवेपेक्षा फक्त स्वतःचे हीत साधण्याच्या प्रयत्नात असते ही देशातील जनता उघड्या डोळ्यांनी पाहत आहे.त्यामुळे सावधान राजकीय पुढाऱ्यांनो कोणतेही कार्य करतांना शहिदांचे अनुकरण अवश्य करावे व त्यांच्या बलीदानाला कोठेही ठेच पोहचणार नाही किंवा तडा जाणार नाही याची दक्षता घ्यावी.हे भारत मातेच्या शहिद भुमि पुत्रांनो माझा कोटी कोटी प्रणाम!देशात बदलत्या हवामानामुळे,जंगल तोडीमुळे व वाढत्या अलनिनोच्या प्रभावामुळे निसर्गाचे संतुलन डगमगले आहे याला संतुलित करण्यासाठी शहिद राजगुरू यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येकांनी वृक्षलागवड केली पाहिजे. मुख्यत्वेकरून राजकीय पुढारी, सरकार, प्रशासन, शाळा-महाविद्यालये, स्थानिक प्रशासन व सामाजिक संस्था यांनी राजगुरू यांच्या जयंतीनिमित्त आठवण म्हणून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे. यामुळे संपूर्ण सृष्टी प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल व प्रत्येक झाडांच्या पानांत, फुलात,फळात आपल्याला शहिद राजगुरूसह संपुर्ण शहिदांचे अवश्य दर्शन होईल.'जब तक सुरज चांद रहेंगा तबतक शहिदोंका नाम रहेंगा' शहिद राजगुरू यांना कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# भाजपला गरज 'दहा तोंडी रावणाची'

या लेखाचे शीर्षक वाचून बरेच जण निश्चितच बुचकळ्यात पडतील. भाजप हा कट्टर 'रामभक्त' पक्ष असताना त्याला रावणाची गरज कशी काय भासू शकते असा प्रश्न मनात येणे स्वाभाविक आहे. या प्रश्नाचे उत्तर लपले आहे ते सध्याच्या देशातील राजकीय परिस्थितीत.

भाजप हा सध्या भारतातील सर्वात बलवान पक्ष असून भारताच्या जवळजवळ ७२% भूभागावर भाजपची थेट अथवा अप्रत्यक्ष सत्ता आहे ती २२ राज्यांच्या माध्यमातून. बाकी सर्व पक्ष विखुरलेले आहेत. काँग्रेस आणि आम आदमी पक्षांकडे थोडीबहुत सत्ता आहे ती सुद्धा हाताच्या बोटावर मोजता येईल एवढ्याच राज्यांमध्ये. केंद्रात भाजप सध्या स्वबलावर सत्तेत नसला तरी मित्र पक्षांच्या साथीने सलग तिसऱ्यांदा केंद्राची सत्ता काबीज करण्याचा पराक्रम या पक्षाने केला आहे. बंगालमध्ये चमत्कार घडवल्यावर भाजपचे संसदेच्या दोन्ही सभागृहात बळ आणखी वाढले आहे आणि त्यात अजून भर पडण्याचीच अधिक शक्यता आहे.भाजपकडे नरेंद्र मोदींसारखे 'करिश्माई 'नेतृत्व आहे. एवढ्या 'पोल पोझिशन' मध्ये असताना सुद्धा सद्यस्थितीत भाजप हा 'हतबल' झाल्याचे चित्र निर्माण करण्यात भाजपचे विरोधक तसेच प्रसार माध्यमे काही प्रमाणात यशस्वी झाल्यासारखे चित्र दिसत आहे. यातच भाजपला 'दहा तोंडी' रावणाची गरज का आहे याचे उत्तर लपलेले आहे.

रामायणात राम रावणाचे घनघोर युद्ध सुरु असताना प्रभू श्रीरामचंद्राच्या बाणांच्या वर्षावाने रावणाची दहा तोंडे (चेहरे ) वारंवार धडापासून अलग होत होती पण पुन्हा त्याच जागी नवी तोंडे उगवत होती. हे बघून श्रीरामचंद्र सुद्धा चक्राऊन गेले. त्यांना समजत नव्हते की 'आज का निष्पळ होती बाण?'.खरे म्हणजे रामाचा प्रत्येक बाण हा शत्रूचा नायनाट करतो अशी प्रभू रामचंद्राची ख्याती होती.आपल्याकडे म्हणूनच कुठल्याही समस्येवर 'रामबाण उपाय ' असा एक वाक्प्रचार प्रचलित आहे.

भाजपची स्थिती रामासारखी झाली आहे. एकामागोमाग एक विरोधकांचा निवडणुकीत पराभव करून सुद्धा, नवनवीन विरोधक भुछत्रासारखे उगवत आहेत आणि ते हरलेल्या पक्षांची जागा घेत आहेत. या विरोधकांना हरबऱ्याच्या झाडावर चढवण्याचे काम विरोधी 'मीडिया ' इमाने इतबारे करत आहे. या 'इको सिस्टिमला ' तोंड कसे द्यायचे हा भाजपपुढे सध्याचा यक्ष प्रश्न आहे. विरोधक वाऱ्याच्या वेगाने अफ़वा पसरवत आहेत आणि त्या अफवांचे निराकरण करण्यात भाजपची फरपट होत आहे.या समस्येचे उत्तर शोधायचा प्रयत्न भाजपचे धुरीण करत आहेत.

या प्रयत्नांचा एक भाग म्हणून भाजपने आपल्या आय.टी. सेलचा तोंडावळा पूर्णपणे बदलून टाकला आहे.नवीन चमू अधिक आक्रमकपणे व परिणामकारक पद्धतीने विरोधकांच्या 'फेक नेरेटिव्ह' चा मुकाबला करेल अशी अपेक्षा आहे. भाजपने आपल्या नवीन कार्यकारिणीची घोषणा नुकतीच केली.अध्यक्ष नितीन नवीन यांच्या या नवीन संघाला शुभेच्छा देताना पंतप्रधान मोदी यांनी त्यांना समाज माध्यमांवर सक्रिय राहण्याचा 'गुरुमंत्र ' दिल्याचे वाचनात आले. सध्याच्या युगात समाज माध्यमे हे जनमानसाच्या मनाचा ठाव घेणारे प्रमुख 'शस्त्र' ठरत आहे त्यामुळे 'गोबेल्स तंत्राप्रमाणे एकच 'खोटे' सर्व माध्यमावर एकाच वेळी पसरवले की जनतेला ते खरे वाटू लागते.महाभारतात भारतीय युद्धात भीमाने 'अश्वथामा' नावाचा हत्ती मारला आणि अश्वथामा मेला अशी आवई उठवली.

द्रोणाचार्यांच्या कानावर ही बातमी गेल्यावर त्यांना वाटले की आपलाच मुलगा ठार झाला. धर्मराजाने 'नरो वा कुंजरोवा ' अशी भूमिका घेतल्यावर द्रोणांनी शस्त्र खाली टाकले आणि पांडवानी त्यांचा वध केला. अगदी असाच प्रकार म्हणजे महाराष्ट्रातून उद्योगधंदे गुजरातला गेले अशी पद्धतशीर आवई उठवण्यात आली होती. गुजरातमध्ये उद्योग सुरु झाला हे खरे होते पण तो उद्योग महाराष्ट्रातून तेथे गेला हे असत्य होते.'ऑपरेशन सिंदूर' मध्ये भारताची ५ राफेल विमाने पाडली असा खोटा प्रचार पाकिस्तानने केला तो आपल्या विरोधी पक्षांनी उचलून धरला आणि एकही राफेल पडले नाही हे सत्य समजायला एक वर्ष जावे लागले तोपर्यंत जनतेच्या मनात संशयाचे भूत कायम राहिले.

भाजप पक्ष व भारत सरकार अफवांचे खंडन करण्यात कमी पडते असा सर्वसाधारण समज तयार झाला आहे. ही परिस्थिती कशामुळे ओढवली आहे?

भाजपला राष्ट्रीय स्तरावर एकही 'नैसर्गिक मित्र नाही '(विचारसरणीच्या आधारे ). शिंदे यांची शिवसेना ही महाराष्ट्रापुरती मर्यादित आहे त्यामुळे राष्ट्रीय मंचावर तिचा आवाज पोहोचत नाही. बाकी भाजपचे एन. डी. ए. तील मित्र पक्ष हे सत्तेसाठी भाजपशिवाय सध्या पर्याय नाही म्हणून भाजपच्या वळचणीला येऊन बसले आहेत., पण ते भाजपच्या सुरात सूर मिसळून एका आवाजात बोलतील याची खात्री नाही. समान नागरी कायद्याला तेलगू देसम खुला पाठिंबा द्यायला कचरत आहे.त्यामुळे भाजप एकटा पडतो. याउलट विरोधी पक्ष विखुरलेले असले तरी भाजपच्या विरोधात एका आवाजात/ सुरात बोलतात, त्यामुळे भले आपापसात एकमेकांना 'ढुशी' देत असले तरी जनतेपर्यंत एकच अफवा १० तोंडाकडून एकाच वेळी फैलावली जाते. यावर उपाय काय?

भाजप हा नेहमी 'रिऍक्टिव्ह' मोड मध्ये दिसतो. त्याऐवजी त्याने 'प्रोऍक्टिव्ह' झाले पाहिजे. तसेच 'सद्गुणविकृतीचा' त्याग केला पाहिजे कारण एव्हरीथिंग इज फेअर इन लव्ह अँड वॉर '.

सकाळचा 'भोंगा' ९ वाजता वाजत असेल तर भाजपने सकाळी ८ वाजता 'बांग' दिली पाहिजे आणि त्या भोंग्याच्याच भाषेत त्याच्याविरुद्ध आरोपांची राळ उठवली पाहिजे.दुपारी केव्हातरी अत्यंत संसदीय भाषेत भोंग्याचा प्रतिवाद करण्याचा प्रयत्न केविलवाणा वाटतो.

भाजप रोज दुपारी दिल्लीत पत्रकार परिषद घेतो. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन /टिपण्णी करतात पण ते ऐकायला लोकं घरी कुठे असतात. त्यामुळे या पत्रकार परिषदा परिणामकारक ठरत नाहीत.

सर्वात महत्वाचे म्हणजे समाजमाध्यमांवर, मीडियामध्ये जे भाजप समर्थक, युट्यूबर्स भाजपची बाजू लावून धरतात त्यांना भाजपने 'बळ' दिले पाहिजे.त्यांना गृहित धरले जाते, अडचणीच्या वेळी मदत दिली जात नाही, त्यांची उपेक्षा केली जाते अशी समान तक्रार गल्लीपासून दिल्लीपर्यंतचे सर्वच पत्रकार करतात. थोडक्यात जेव्हा या लोकांना छत्रीची गरज असते तेव्हाच ती काढून घेतली जाते.

भाजपचा हा सर्वात मोठा दोष आहे.

अजून एक कमतरता म्हणजे भाजपचे स्वतःचे अधिकृत मुखपत्र नाही.ऑर्गनायझर, पांचजन्य, तरुण भारत ही वृत्तपत्रे संघ परिवाराकडून चालवली जातात पण त्यांची 'विजीबीलिटी ' नाही. त्यांचा खप किती व कुठे आहे? गेले एक तपभर दिल्लीत सत्तेत असूनही भाजप मीडिया मध्ये आपली फूटप्रिंट उठवण्यात अपयशी ठरला आहे. महाराष्ट्रात तरुण भारतच्या अग्रलेखांची चर्चा होण्याऐवजी 'सामनाचे ' अग्रलेख सर्व मराठी वाहिन्या वाचून दाखवतात ही भाजपसाठी शरमेची गोष्ट आहे.

राष्ट्रीय स्तरावर जे भाजपचे प्रवक्ते आहेत ते अभ्यासू व आक्रमक आहेत. सुधांशु त्रिवेदी यांनी तर प्रवक्ता कसा असावा याचा आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे. पण महाराष्ट्रातील एकेक 'मुखदुर्बल' प्रवक्ते पाहिले की भाजपची 'कीव' येते. वाहिन्यांचे 'अँकर्स ' जेव्हा सत्ताधारी असूनही भाजपला खिंडीत गाठण्याचा प्रयत्न करतात तेव्हा भाजपवाले त्यांचे तोंड बंद करू शकत नाहीत. ते बचावात्मक भूमिकेत जातात.

भाजप हा राजकीय पक्ष आहे, संघासारखी सांस्कृतिक संघटना नाही. तेव्हा संघाच्या आदर्शवादी विचारसरणीचे ओझे किती दिवस वाहणार याचा विचार भाजपने गंभीरपणे करण्याची वेळ आली आहे. भाजपला जेव्हा याचे चटके बसतात तेव्हा संघ त्यांच्या मदतीला धावून न येता हात झटकून मोकळा होतो हे अनेकदा दिसून आलेले आहे.

२०२९ मध्ये भाजपला विरोधी पक्षांचे आव्हान नाही तर त्यांच्या इको सिस्टिमचे आव्हान अधिक आहे. येत्या तीन वर्षात भाजपने आपली मजबूत व वरचढ इको सिस्टिम निर्माण करणे अत्यंतिक गरजेचे आहे आणि त्यासाठी त्यांना रावणाच्या दहा तोंडांची गरज आहे.२०२९ ची निवडणूक ही या दोन इको सिस्टिममध्ये होणार आहे.

**- रघुनंदन भागवत**

# ज्ञानातून समतेची वाटचाल : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा गौरवशाली प्रवास

२३ ऑगस्ट हा दिवस महाराष्ट्रातील मराठवाडा प्रदेशाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. २३ ऑगस्ट १९५८ रोजी मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली आणि या प्रदेशाच्या उच्च शिक्षणाच्या इतिहासात एका नव्या पर्वाचा प्रारंभ झाला. पुढे १४ जानेवारी १९९४ रोजी या विद्यापीठाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' ही ओळख अधिक दृढ झाली. त्यामुळे विद्यापीठाचा वर्धापनदिन हा केवळ एका शैक्षणिक संस्थेच्या स्थापनेचा स्मृतिदिन नाही, तर ज्ञानाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन, समता, सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठेच्या मूल्यांना बळ देण्याचा संकल्पदिन आहे. २३ ऑगस्ट २०२६ रोजी विद्यापीठाचा ६८ वा वर्धापनदिन साजरा होत असताना गेल्या सहा दशकांहून अधिक काळातील या ज्ञानसंस्थेच्या वाटचालीकडे अभिमानाने पाहतानाच तिच्या भविष्यातील जबाबदाऱ्यांचाही गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. मराठवाड्यातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या आकांक्षांना आकार देणारे हे विद्यापीठ आज केवळ एक शैक्षणिक केंद्र राहिलेले नाही, तर ज्ञान, संशोधन, सामाजिक जाणीव आणि परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण केंद्र बनले आहे.

मराठवाड्याच्या सामाजिक इतिहासाचा विचार केला तर या प्रदेशात उच्च शिक्षणाच्या सुविधांची कमतरता दीर्घकाळ जाणवत होती. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाडा हैदराबाद संस्थानाचा भाग होता. त्या काळात उच्च शिक्षणाच्या सुविधा अत्यंत मर्यादित होत्या. परिणामी, उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना दूरच्या शहरांमध्ये जावे लागत असे. आर्थिक परिस्थिती, सामाजिक विषमता, भौगोलिक अंतर आणि मर्यादित शैक्षणिक साधने यांमुळे सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी सहज उपलब्ध होत नव्हती. स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही, सामाजिक न्याय आणि विकासाची नवी दिशा स्वीकारली. शिक्षण हे व्यक्तीच्या उन्नतीचे आणि समाजाच्या परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, ही जाणीव अधिक दृढ झाली. मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी या प्रदेशातच उच्च शिक्षणाची सक्षम व्यवस्था असणे गरजेचे आहे, अशी मागणी समाजातील शिक्षणप्रेमी, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडून पुढे आली. त्यामुळे स्वतंत्र विद्यापीठाची मागणी ही केवळ प्रशासकीय सुविधेची मागणी नव्हती; ती मराठवाड्याच्या शैक्षणिक स्वाभिमानाची आणि ज्ञानाच्या समान अधिकाराची मागणी होती.

मराठवाड्यात स्वतंत्र विद्यापीठ स्थापन व्हावे यासाठी अनेक वर्षे प्रयत्न झाले. अखेरीस २३ ऑगस्ट १९५८ रोजी विद्यापीठाची स्थापना झाली. मराठवाड्याच्या शैक्षणिक इतिहासातील हा क्षण अत्यंत महत्त्वाचा ठरला. उच्च शिक्षणाच्या अभावामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याच्या दिशेने टाकलेले हे ऐतिहासिक पाऊल पुढील अनेक दशकांतील सामाजिक परिवर्तनाचा पाया बनले.

विद्यापीठाची सुरुवात आजच्या तुलनेत अत्यंत मर्यादित साधनसामग्रीतून झाली. त्या काळात आजच्यासारख्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. मात्र ज्ञाननिर्मितीची जिद्द, शिक्षकांची बांधिलकी आणि विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या आकांक्षा यांमुळे विद्यापीठाची वाटचाल सातत्याने सुरू राहिली. कालांतराने विद्यापीठाचा परिसर विस्तारला, विविध विद्याशाखा आणि विभागांची निर्मिती झाली, ग्रंथालय समृद्ध झाले, प्रयोगशाळा आणि संशोधन सुविधा वाढल्या आणि विविध ज्ञानशाखांमध्ये अध्यापन व संशोधनाला चालना मिळाली. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांच्या माध्यमातून मराठवाड्याच्या विविध भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या. एका मर्यादित सुरुवातीपासून व्यापक शैक्षणिक परिवारापर्यंत झालेला हा प्रवास म्हणजे मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासाची एक महत्त्वपूर्ण कहाणी आहे.

या विद्यापीठाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणजे नामविस्तार होय. १४ जानेवारी १९९४ रोजी विद्यापीठाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले. या नामकरणाने विद्यापीठाची ओळख केवळ एका महान व्यक्तिमत्त्वाशी जोडली गेली नाही, तर समता, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, बंधुता, मानवी प्रतिष्ठा आणि शिक्षणाच्या परिवर्तनकारी शक्तीशीही ती दृढ झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला सामाजिक मुक्तीचे प्रभावी साधन मानले. अज्ञान, अंधश्रद्धा, सामाजिक विषमता आणि अन्याय यांविरुद्ध संघर्ष करण्यासाठी ज्ञान आणि विवेक आवश्यक आहेत, असा त्यांचा ठाम विश्वास होता. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा त्यांचा संदेश आजही सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला दिशा देणारा आहे. त्यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विद्यापीठाची जबाबदारी त्यामुळे केवळ पदवी प्रदान करण्यापुरती मर्यादित राहू शकत नाही. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाबरोबर विवेक, सामाजिक बांधिलकी, संविधानिक मूल्यांची जाणीव आणि मानवी संवेदनशीलता निर्माण करणे ही या विद्यापीठाची व्यापक जबाबदारी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन आजच्या काळात अधिकच प्रासंगिक आहे. शिक्षण म्हणजे केवळ माहितीचे संकलन किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्याचे साधन नव्हे. शिक्षण माणसाला प्रश्न विचारण्याची क्षमता देते, रूढी-परंपरांचे चिकित्सक परीक्षण करण्याची दृष्टी देते आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे बौद्धिक सामर्थ्य निर्माण करते. शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्या अधिकारांची जाणीव होते आणि जबाबदाऱ्यांचे भानही प्राप्त होते. त्यामुळे विद्यापीठ हे केवळ परीक्षा, पदव्या आणि प्रमाणपत्रांचे केंद्र न राहता विचारनिर्मितीचे, संशोधनाचे, मुक्त संवादाचे आणि सामाजिक परिवर्तनाचे केंद्र असले पाहिजे. विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख ज्ञान आणि कौशल्ये देतानाच त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन, संविधानिक मूल्यांची निष्ठा, सामाजिक संवेदनशीलता आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना निर्माण झाली पाहिजे. विद्यापीठाच्या नावामागील विचारधारा आणि प्रत्यक्ष शैक्षणिक कार्य यांच्यातील सुसंवादातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा खरा सन्मान होऊ शकतो.

मराठवाडा हा इतिहास, संस्कृती, साहित्य आणि लोकपरंपरांनी समृद्ध प्रदेश आहे. अजिंठा-वेरूळच्या ऐतिहासिक वारशापासून संतपरंपरेपर्यंत, लोककलेपासून आधुनिक साहित्यापर्यंत आणि विविध समाजघटकांच्या जीवनपद्धतींपासून सामाजिक चळवळींपर्यंत या प्रदेशाचे सांस्कृतिक विश्व अत्यंत व्यापक आहे. या वारशाचा शास्त्रीय अभ्यास, संवर्धन आणि पुढील पिढ्यांपर्यंत हस्तांतरण करण्यात विद्यापीठाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. विविध ज्ञानशाखांमधील अध्यापन आणि संशोधनामुळे विद्यापीठाच्या ज्ञानविश्वाला व्यापकता प्राप्त झाली आहे. मराठवाड्याच्या सामाजिक वास्तवाचे चिकित्सक आकलन करून घेणे आणि त्या वास्तवावर आधारित ज्ञाननिर्मिती करणे ही या विद्यापीठाची विशेष ओळख ठरू शकते.

विद्यापीठाच्या स्थापनेचा सर्वांत व्यापक परिणाम म्हणजे मराठवाड्यात उच्च शिक्षणाचा झालेला सामाजिक विस्तार. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांच्या माध्यमातून विविध जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना पदवी, पदव्युत्तर आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध झाल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या परिसराच्या जवळ राहून उच्च शिक्षण घेण्याचा मार्ग खुला झाला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ग्रामीण, वंचित आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात प्रवेश मिळाला. अनेक विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या कुटुंबाच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत सकारात्मक बदल घडवून आणला. शिक्षक, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, संशोधक, वकील, पत्रकार, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील व्यावसायिक म्हणून विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांनी आपले योगदान दिले. त्यामुळे विद्यापीठाचा प्रभाव केवळ विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक प्रगतीपुरता मर्यादित राहिला नाही; त्याने कुटुंबे, समाजघटक आणि संपूर्ण प्रदेशाच्या विकासप्रक्रियेला चालना दिली.

उच्च शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. एका व्यक्तीला मिळालेले शिक्षण अनेकदा संपूर्ण कुटुंबाच्या पुढील पिढ्यांच्या जीवनाला दिशा देते. शिक्षणामुळे रोजगाराच्या संधी वाढतात, निर्णयक्षमता विकसित होते, आत्मविश्वास निर्माण होतो आणि सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याची दृष्टी व्यापक होते. विशेषतः ग्रामीण आणि वंचित समाजघटकांसाठी उच्च शिक्षण हे सामाजिक गतिशीलतेचे महत्त्वाचे माध्यम ठरते. मराठवाड्यातील अनेक युवक-युवतींनी पारंपरिक सामाजिक आणि आर्थिक मर्यादा ओलांडून शिक्षणाच्या माध्यमातून नव्या संधी प्राप्त केल्या. त्यांच्या शैक्षणिक प्रगतीमुळे कुटुंबांच्या अपेक्षा बदलल्या, पुढील पिढ्यांमध्ये शिक्षणाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला आणि समाजात नव्या नेतृत्वाचा उदय झाला. या व्यापक प्रक्रियेला संस्थात्मक आधार देण्यात विद्यापीठाची भूमिका निःसंशय महत्त्वाची आहे.

आजच्या बदलत्या काळात उच्च शिक्षणासमोर नव्या स्वरूपाची आव्हाने उभी आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान, स्वयंचलितीकरण, जागतिकीकरण, माहितीचा प्रचंड वेग आणि बदलती रोजगारव्यवस्था यामुळे शिक्षणाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकी ज्ञान देणे आता पुरेसे राहिलेले नाही. चिकित्सक विचार, सर्जनशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता, डिजिटल साक्षरता, संवादकौशल्य, संशोधनवृत्ती, उद्योजकता आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता या आजच्या शिक्षणाच्या आवश्यक बाबी आहेत. मात्र आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करताना मानवी मूल्ये आणि सामाजिक संवेदनशीलता यांची उपेक्षा होऊ नये. तंत्रज्ञान हे शिक्षण अधिक प्रभावी बनविण्याचे साधन आहे; परंतु शिक्षणाचे अंतिम ध्येय विवेकी, संवेदनशील, नैतिक आणि जबाबदार नागरिक घडविणे हेच असले पाहिजे. आधुनिक ज्ञान आणि मानवी मूल्ये यांचा समतोल साधणे हे आगामी काळातील विद्यापीठाचे महत्त्वाचे आव्हान आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०च्या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षणात आंतरशाखीय शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम, संशोधन, नवोपक्रम, लवचिकता आणि स्थानिक ज्ञानाचा आधुनिक ज्ञानाशी संवाद यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने या बदलांचा स्वीकार करताना मराठवाड्याच्या स्थानिक गरजांना केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. जागतिक ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करताना स्थानिक सामाजिक प्रश्नांवर संशोधन करणे ही या विद्यापीठाची विशेष जबाबदारी आहे. मराठवाड्यातील दुष्काळ, पाणीटंचाई, शेती, शेतकरी प्रश्न, ग्रामीण बेरोजगारी, स्थलांतर, महिलांचे सक्षमीकरण, आदिवासी समाज, दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, युवकांचे प्रश्न, ग्रामीण शिक्षण, आरोग्य, डिजिटल दरी, सामाजिक विषमता आणि पर्यावरणीय समस्या या विषयांवर व्यापक आणि आंतरशाखीय संशोधनाची गरज आहे. विद्यापीठातील संशोधन समाजाच्या प्रत्यक्ष प्रश्नांशी जोडले गेले तर ज्ञाननिर्मितीला अधिक व्यापक सामाजिक अर्थ प्राप्त होईल.

विद्यापीठ आणि समाज यांच्यातील नाते अधिक दृढ करण्याची आज नितांत गरज आहे. विद्यापीठात निर्माण होणारे ज्ञान केवळ शैक्षणिक वतुर्ळात मर्यादित न राहता ग्रामीण आणि वंचित समाजघटकांपर्यंत पोहोचले पाहिजे. ग्रामविकास, आरोग्यजागृती, पर्यावरण संवर्धन, डिजिटल साक्षरता, महिला सक्षमीकरण, युवक कौशल्यविकास आणि सामाजिक जागृतीच्या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढविला पाहिजे. समाजाच्या प्रत्यक्ष समस्यांचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक संवेदनशीलता निर्माण होते आणि त्यांच्या शिक्षणाला व्यवहार्य अर्थ प्राप्त होतो. विद्यापीठाच्या भिंतींच्या आत निर्माण झालेले ज्ञान समाजाच्या जीवनात उतरले तरच विद्यापीठ खऱ्या अर्थाने समाजाचे ज्ञानकेंद्र ठरते. 'ज्ञान समाजासाठी' ही भावना प्रत्यक्ष कृतीत उतरविणे ही विद्यापीठाची सामाजिक बांधिलकी असली पाहिजे.

विद्यार्थीकेंद्रित आणि समावेशक शिक्षण ही आधुनिक विद्यापीठाची महत्त्वाची ओळख असली पाहिजे. ग्रामीण भागातून येणारे विद्यार्थी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थी, दिव्यांग विद्यार्थी आणि उच्च शिक्षणाच्या पहिल्या पिढीत प्रवेश करणारे विद्यार्थी यांच्यासाठी संवेदनशील आणि समावेशक वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमी समान नसते. त्यामुळे समान संधींबरोबर गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक आधार देणे ही सामाजिक न्यायाची व्यवहार्य बाजू आहे. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली ठेवणे आणि कोणताही विद्यार्थी आर्थिक, सामाजिक किंवा भौगोलिक कारणांमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी सातत्याने प्रयत्न करणे ही बाबासाहेबांच्या विचारांना साजेशी कृती ठरेल.

गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सामाजिक न्याय हे परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विद्यापीठाने उत्कृष्टतेसोबत समावेशकतेलाही समान महत्त्व दिले पाहिजे. जागतिक दर्जाचे संशोधन करताना स्थानिक प्रश्नांकडे दुर्लक्ष न करणे, आधुनिक कौशल्ये विकसित करताना मानवी मूल्यांचे संवर्धन करणे आणि स्पर्धात्मक जगासाठी विद्यार्थ्यांना तयार करताना सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणे ही विद्यापीठाची खरी कसोटी आहे.

वर्धापनदिन हा केवळ गौरवगाथा सांगण्याचा प्रसंग नसून आत्मपरीक्षणाची संधी आहे. गेल्या ६८ वर्षांत विद्यापीठाने काय साध्य केले, मराठवाड्याच्या सामाजिक आणि शैक्षणिक विकासात त्याचे योगदान किती व्यापक झाले, कोणती आव्हाने अद्याप कायम आहेत आणि आगामी काळात विद्यापीठाने कोणती दिशा स्वीकारली पाहिजे, याचा विचार या दिवशी होणे आवश्यक आहे. भूतकाळाचा गौरव हा भविष्याची जबाबदारी स्वीकारण्याची प्रेरणा देणारा असला पाहिजे. इतिहासाचा अभिमान बाळगताना भविष्याचा वेध घेणे हीच वर्धापनदिनाची खरी गरज असली पाहिजे.

२३ ऑगस्ट १९५८ रोजी प्रज्वलित झालेली ज्ञानज्योत आज असंख्य विद्यार्थी, शिक्षक, संशोधक आणि माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून अधिक व्यापक झाली आहे. या ज्ञानज्योतीला पुढील पिढ्यांपर्यंत अधिक तेजाने पोहोचविणे ही वर्तमान पिढीची जबाबदारी आहे. जागतिक ज्ञानाशी संवाद साधताना आपल्या मातीशी असलेले नाते तुटता कामा नये आणि आधुनिकतेचा स्वीकार करताना मानवी संवेदना हरवता कामा नये. मराठवाड्याच्या प्रश्नांना राष्ट्रीय आणि जागतिक ज्ञानविश्वात स्थान मिळवून देण्याची क्षमता या विद्यापीठात आहे. ज्ञान, संशोधन आणि सामाजिक बांधिलकी यांचा समन्वय साधून विद्यापीठाने पुढील पिढ्यांसाठी नवे आदर्श निर्माण करावेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापनदिन म्हणजे शिक्षणाच्या परिवर्तनकारी शक्तीवर विश्वास व्यक्त करण्याचा दिवस आहे. शिक्षणामुळे व्यक्ती सक्षम होते, समाज जागृत होतो आणि लोकशाही बळकट होते. बाबासाहेबांनी शिक्षणाला दिलेले महत्त्व लक्षात घेतले तर या विद्यापीठाचे अंतिम ध्येय केवळ पदवीधरांची संख्या वाढविणे नसून विवेकी, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले, संवेदनशील, संविधाननिष्ठ आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार नागरिक घडविणे हे असले पाहिजे. शिक्षणातून स्वाभिमान, ज्ञानातून समता, संशोधनातून परिवर्तन आणि संस्कारातून सामाजिक जबाबदारी निर्माण झाली तरच विद्यापीठाच्या स्थापनेमागील व्यापक उद्दिष्ट खऱ्या अर्थाने साकार होईल.

मराठवाड्याच्या जनतेने ज्या शैक्षणिक स्वप्नातून स्वतंत्र विद्यापीठाची मागणी केली, त्या स्वप्नाचे आज एका व्यापक ज्ञानसंस्थेत रूपांतर झाले आहे. आता या वारशाला नव्या पिढीच्या आकांक्षांशी जोडण्याची वेळ आली आहे. आगामी काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने ज्ञाननिर्मिती, संशोधन, नवोपक्रम, सामाजिक न्याय, कौशल्यविकास आणि मानवी विकासाच्या क्षेत्रात अधिक व्यापक योगदान द्यावे, अशी अपेक्षा आहे. २३ ऑगस्टचा वर्धापनदिन हा भूतकाळाच्या गौरवाबरोबरच उज्ज्वल भविष्याचा संकल्प करण्याचा दिवस ठरावा.

शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली ठेवत, ज्ञानाचा प्रकाश समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवत आणि समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या संविधानिक मूल्यांना बळकटी देत विद्यापीठाची ज्ञानयात्रा अखंड सुरू राहो. मराठवाड्याच्या मातीतील ज्ञान, संघर्ष आणि परिवर्तनाच्या परंपरेला आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधनाची जोड देत हे विद्यापीठ राष्ट्रीय तसेच जागतिक ज्ञानविश्वात अधिक प्रभावी स्थान निर्माण करो, हीच विद्यापीठाच्या ६८व्या वर्धापनदिनानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

# ईद मिलादुन्नबीच्या पार्श्वभूमीवर ‘आपले शहर-आपली जबाबदारी’ अभियान

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- ईद मिलादुन्नबीच्या पार्श्वभूमीवर शहर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्याचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वपक्षीय मुस्लिम आघाडी व नशामुक्त अभियान यांच्या वतीने ‘आपले शहर – आपली जबाबदारी’ या स्वच्छता जनजागृती अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे. या अभियानाची सर्वप्रथम सुरुवात किराडपुरा येथील बदाम गल्ली परिसरातून करण्यात आली. त्यानंतर सोमवार, २४ ऑगस्ट रोजी प्रभाग क्रमांक १५ व १६ मधील सफिना मस्जिद, उंट मोहल्ला, बागवान गल्ली, सब्जी मंडी, पैठण गेट आणि सिल्ली खाना परिसरात घराघरांत जाऊन जनजागृती करण्यात आली.

सर्वपक्षीय मुस्लिम आघाडीचे संस्थापक अध्यक्ष साजीद मौलाना यांच्या नेतृत्वाखाली हे अभियान राबविण्यात येत आहे. ‘स्वच्छ शहर – सुंदर परिसर’ हा संदेश घेऊन नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधत स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे आवाहन करण्यात आले.

अभियानाच्या माध्यमातून परिसरात कचरा न टाकता घंटागाडीतच कचरा देणे, ओला व सुका कचरा वेगळा करणे, पाणी व वीज बचत करणे, घरपट्टी व पाणीपट्टी वेळेवर भरणे तसेच गुंठेवारी नियमितीकरणाबाबत नागरिकांना माहिती देण्यात आली.

यावेळी ‘पाणी वाचवा – भविष्य वाचवा’, ‘वीज वाचवा – देश वाचवा’, ‘कर भरा – शहर संवारा’, ‘कचरा घंटागाडीतच टाका’ आणि ‘स्वच्छ शहर – सुंदर परिसर’ अशा संदेशांच्या माध्यमातून नागरिकांना शहराच्या विकासात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

साजीद मौलाना म्हणाले, ‘ईद मिलादुन्नबीच्या पार्श्वभूमीवर स्वच्छतेचा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. किराडपुरा बदाम गल्ली येथून सुरू झालेली ही मोहीम आता प्रभाग क्रमांक १५ व १६ मध्ये पोहोचली आहे. शहर स्वच्छ ठेवणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. नागरिकांनी स्वतः पुढाकार घेतला, तर आपले छत्रपती संभाजीनगर निश्चितच स्वच्छ, सुंदर आणि आदर्श शहर बनू शकते.’

ते पुढे म्हणाले, ‘ही मोहीम केवळ एका परिसरापुरती मर्यादित राहणार नाही. सर्वपक्षीय मुस्लिम आघाडी व नशामुक्त अभियानाच्या माध्यमातून यापुढे संपूर्ण शहरातील प्रत्येक वार्ड, परिसर आणि गल्ली-मोहल्ल्यात जाऊन स्वच्छता व नागरी जबाबदारीबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. घराघरांत हा संदेश पोहोचवून नागरिकांचा सहभाग वाढविणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.’

# जेन झी युवाशक्तीचा जागर; राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या युवा संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर, दि. २४ (प्रतिनिधी) – आजच्या जेन झी पिढीच्या आवडी, ऊर्जा आणि कौशल्याला राष्ट्रनिर्माणाच्या कार्याशी जोडण्याचा अभिनव प्रयत्न राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने शहरातील विविध नगरांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या युवा संमेलनांमधून करण्यात आला. डॉ. हेडगेवार नगर, स्वामी विवेकानंद नगर, हनुमान नगर, मल्हार नगर यांसह विविध नगरांमध्ये झालेल्या या उपक्रमांना तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आजच्या तरुणांना केवळ पारंपरिक व्याख्यानांपुरते मर्यादित न ठेवता त्यांच्या आवडीच्या माध्यमातून त्यांच्याशी संवाद साधण्यावर या संमेलनांमध्ये विशेष भर देण्यात आला. ट्रेकिंग, फुटबॉल, बाइक रॅली तसेच विविध मैदानी आणि साहसी खेळांच्या माध्यमातून तरुणांमध्ये नेतृत्वगुण, संघभावना, शिस्त, आत्मविश्वास आणि सामाजिक बांधिलकी रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

आजची जेन झी पिढी तंत्रज्ञान, नवकल्पना आणि वेगवान बदलांची पिढी



आहे. या युवा शक्तीला योग्य दिशा मिळाल्यास ती भारताच्या भविष्यातील सर्वात मोठी ताकद ठरणार आहे, हा विचार या संमेलनांच्या केंद्रस्थानी होता. करिता जेन झी बरोबर राष्ट्र-निर्माणाचा संवाद साधण्यात येत आहे.

स्वामी विवेकानंदांच्या प्रेरणेतून युवा शक्ती जागृत करणे आणि परम पूजनीय डॉ. केशव बलिराम हेडगेवारजींच्या राष्ट्रकार्याच्या विचारातून संघटनशक्तीची जाणीव निर्माण करणे आहे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. खेळातून मैत्री, संस्कारातून नेतृत्व आणि संघटनेतून राष्ट्रनिर्माण फुटबॉल, ट्रेकिंग आणि बाइक रॅलीसारख्या उपक्रमांमुळे तरुणांना एकत्र येण्याची, नवीन मित्र जोडण्याची आणि संघभावनेचा अनुभव घेण्याची संधी मिळाली. त्याचबरोबर संस्कार, सेवा, संघटन आणि राष्ट्रभावना या मूल्यांशी त्यांचा परिचय करून देण्यात आला. युवा संमेलनांमधून एक स्पष्ट संदेश देण्यात आला. आजचा युवा केवळ उद्याचा भारत घडविणार नाही तर तो आजपासूनच भारताच्या राष्ट्रनिर्माणात सहभागी आहे. महाविद्यालयीन स्वयंसेवकांच्या अथक परिश्रमातून यशस्वी आयोजन. या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या महाविद्यालयीन स्वयंसेवकांनी नियोजन, संपर्क, प्रचार, व्यवस्था आणि प्रत्यक्ष आयोजनासाठी मोठी मेहनत घेतली.* स्थानिक स्वयंसेवकांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे विविध नगरांमधील कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या आयोजनात श्री रामदासजी निकम, श्रीरामजी पांडे, प्रा. डॉ. गोपालजी बल्लोज, श्री कृष्णाजी यादव, श्री किरणजी खडके यांच्यासह विविध कार्यकर्ते व आयोजकांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या महाविद्यालयीन स्वयंसेवकांनी घेतलेली मेहनत, तरुणांशी साधलेला सातत्यपूर्ण संपर्क आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे या युवा संमेलनांना विशेष स्वरूप प्राप्त झाले.

तंत्रज्ञानाची ऊर्जा + तरुणाईची ताकद + संस्कारांची दिशा + संघटनेची शक्ती = समर्थ राष्ट्र. या विचारातून जेन झी युवाशक्तीला राष्ट्रनिर्माणाच्या प्रवाहात सक्रियपणे जोडण्याचा हा प्रयत्न आगामी काळातही अधिक व्यापक करण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला. युवा जागा झाला, तर राष्ट्र जागे होते; युवा संघटित झाला, तर राष्ट्र शक्तिशाली होते!

# जेष्ठ नागरिक ही राष्ट्रीय ठेव असून देशाची राष्ट्रीय अनमोल संपत्ती आहे-व्याख्याते देशमुख



वैजापूर दि. २५ (प्रतिनिधी) – देशात पंधरा कोटी वर जेष्ठ नागरिक आहेत.त्यांनी आपले उतरणीचे जीवन मित्र जोडून आद, सुखात, समाधानात घालवावे,तरुण पिढीच्या कामात ढवळा-ढवळ करून अपमानित होऊ नका,कारण तरुण पिढीला आपला हस्तक्षेप नको असतो याची जाण ठेऊन आपापल्या परीने जीवन जगून जीवनाचा आनंद घ्यावा असे आवाहन व्याख्याते अशोक देशमुख यांनी समता पतसंस्था द्वारा आयोजित ‘हसत खेळत तणाव’ मुक्ती कार्यक्रमात सोमवार (ता, २४)रोजी येथील लक्ष्मी -नारायण लान्स मध्ये आयोजित कार्यक्रमात केले. सदरील कार्यक्रम समता पतसंस्था शाखा वैजापूर ने आयोजित केला होता. जेष्ठ नागरिकांनी आनंदी जीवन कसे जगावे? सर्व वयोगटातील नागरिकांनी हसत-खेळत तणाव मुक्त जीवनाचा आनंद कसा घ्यावा? यावर व्याख्यान देऊन विविध उदाहरणे देऊन उपस्थित जेष्ठ नागरिकांना मनसोक्त हसविले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समताचे सर्वे सर्वा व चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे होते. त्यांनीही विशद केले की,जेष्ठ नागरिक ही या महान राष्ट्राची अनमोल संपत्ती आहे. त्यांचा सांभाळ सुव्यवस्थित व्हावा यासाठी समता पतसंस्था सदैव त्यांच्या पाठीशी उभी आहे.त्यानी या निमित्ताने पतसंस्थेचा लेखा जोखा सादर केला.या प्रसंगी जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत व अशोक धसे यांनी मनोगत व्यक्त केले.काका कोयटे, वैजीनाथ जेष्ठ नागरिक संघ अध्यक्ष प्रकाशशेठ बोथरा, सचिव व पेशंनर्स संघटनेचे अध्यक्ष धोंडीरामसिंह राजपूत, आधारचे अध्यक्ष उत्तमराव साळुंके, अण्णा साहेब शेळके, चैतन्य जेष्ठ नागरिक संघाचे साहेबराव साळुंके, अशोक देशमुख व्यापारी संघाचे काशिनाथशेठ गायकवाड, रवींद्र आप्पा साखरे, उत्कर्ष महिला अध्यक्ष सौ.अंजलीताई जोशी, श्रीमती भालेराव, यांनी दीपप्रज्वलन केले. या प्रसंगी पतसंस्था सदस्य सह जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जेष्ठ नागरिक पी.वाय, चव्हाण, गोपालदास, कृष्णा काबळे, पोटे, अरुण बापते, पी.जी. श्रीवास्तव आदी जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्र संचलन चव्हाण यांनी केले,संजय मोरे शाखाधिकारी वैजापूर यांनी आभार व्यक्त केले.वैजापूर व कोपरगाव शाखेच्या कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला.

# मंत्री ना.अतुलजी सावे यांना कवी धोंडीरामसिंह राजपूत यांच्याकडून कविता संग्रह भेट



छत्रपती संभाजीनगर, दि. २४ (प्रतिनिधी)- वैजापूर ता.२४ वैजापूरचे जेष्ठ साहित्यिक व जेष्ठ समाजसेवक, कवी धोंडीरामसिंह राजपूत यांनी शेतकरी जीवनाच्या व्यथा काव्य स्वरूपातगुंफून त्यांच्या व्यथा,समस्या,अडचणी याना वाचा फुटावी व त्यांना योग्य न्याय मिळावा म्हणून त्यांच्या जीवनावर व समस्यावरील विविध विषयांवर ११२ कविता असलेला कविता संग्रह ‘चिंतातुर शेतकरी‘ तसेच महिला-तरुणी यांचा अन्याय, अत्याचार विरुद्ध लढा, दिव्यांगांचा लढा, सीमेवरील सैनिकांचा लढा, शेतकरी लढा, युवक-युवतींचा लढा अशा विविध विषयावरील लढ्याना सुद्धा काव्यात गुंफण करून धोंडीरामसिंह ध राजपूत यांचा ‘लढा‘हा कविता संग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे.महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास, अपारंपरिक ऊर्जा, व दिव्यांग कल्याण मंत्री ना.अतुलजी सावे याना रविवार (ता.२३)रोजी हे दोन्ही काव्य संग्रह भेट दिले, व शेतकरी चिंता तसेच महिला,मुलीच्या अन्याय, अत्याचार ,लढ्याला न्याय देऊन त्यांच्यावरील अन्याय ,अत्याचार थांबवण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्याची विनंती केली.

# राज्यातील जि.प.सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचे सेवा निवृत्ती वेतन शासकीय कोषागारातून द्या

## - सेवानिवृतांची संभाजीनगर मेळाव्यात एकमुखी मागणी

वैजापूर, दि. २४ (प्रतिनिधी) – राज्यातील जिल्हा परिषद सेवा निवृत्त शिक्षक व सर्व विभागातील सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन एक तारखेला शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शासकीय कोषागारातूनच द्यावे.महानगरपालिका,व नगरपालिका कर्मचारी वर्गाना शंभर टक्के वेतन शासनानेच द्यावे, तसेच केंद्र शासनाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांप्रमाणे एक हजार रुपये वैद्यकीय अंशदान द्यावे अशा एकमुखी मागण्या छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेसाठी आलेल्या सेवा निवृत्त कर्मचारी वर्गाने रविवार(ता,२३)रोजी येथील मौ. अबुल कलाम सभागृहात केल्या.आहिल्यानगर चे अध्यक्ष दशरथ ठुबे,बृहन्मुंबई चे अध्यक्ष कमलाकर क्षीरसागर व वर्धा जिल्हा पेन्शनर्स चे अध्यक्ष अरविंद शेट्टीवार यांनी सेवा निवृत्त कर्मचारी संघटना अधिक बळकटी साठी सेवानिवृत्तानी संघटनेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले,.सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी एम.के.देशमुख यांनी सेवा निवृत्त संघटनेने नुकतेच सेवानिवृत्त झालेल्या कर्मचारी



वर्गाला घेतल्यास संघटना आणखी जोमाने कार्य करतील यासाठी नव्याना संधी मिळावी असे सुचविले तसेच सेवा निवृत्तांच्या प्रश्नांना मार्गी लावण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करणार असे आश्वासन दिले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य शिखर पेन्शनर्स असोसिएशनचे पुणे चे वसंतराव वाबळे होते.त्यांनीही संघटीत होऊन संघटना बळकटी साठी आवाहन केले.प्रास्तविक संभाजीनगर जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष वसंतराव सबनीस यांनी करून उपस्थितांचे स्वागत केले.जिल्हा शाखेचे कार्याध्यक्ष विलास जाधब यांनी पेन्शनर्स साठी विविध योजना व परिपत्रक माहिती दिली.उपाध्यक्ष अरविंद देशमुख, प्रकाश कुलकर्णी, सचिव नामदेव घुगे,कोषाध्यक्ष जनार्दन अमृतकर,श्रीमती गंगा वाघमारे, रजनी नागवंशी,बाबूलाल परदेशी, एस, एस, सूर्यवंशी,पुरुषोत्तम क्षीरसागर यांनी सहभाग नोंदविला.याप्रसंगी तालुकाध्यक्ष सर्वश्री बी.एल. कुंभकर्ण( कन्नड),एम जे ननावरे (गंगापूर),मालन ताई घोडके (खुलताबाद), टी, डब्ल्यू सोनवणे (सिल्लोड),धोंडीराम सिंह राजपूत( वैजापूर,) विकास बाविस्कर (सोयगाव) जनार्दन शिंदे (बीडकीन) बाबूलाल परदेशी यांच्या सह जिल्ह्यातील पेन्शनर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विमामहर्षी अण्णासाहेब चिरमुले सोसायटीची ६५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. २४ (प्रतिनिधी)- **विमा** महर्षी अण्णासाहेब चिरमुले को-ऑप क्रेडिट सोसायटी, सातारा यांची ६५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच आयडीबीआय बँक,युनायटेड वेस्टर्न बिल्डिंग,शिवाजी सर्कल सातारा येथे संपन्न झाली. या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षपदी संस्थेचे अध्यक्ष श्री दत्तात्रय नागपूरकर होते.

अहवाल सालात मृत्युमुखी पडलेल्या बँकेचे सभासद, माजी, आजी अधिकारी कर्मचारी तसेच विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांना श्रद्धांजली वाहिली व दुर्घटनाग्रस्त कुटुंबियाप्रती सहवेदना व्यक्त केली. विमा महर्षी अण्णासाहेब चिरमुले यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून सभेची सुरुवात झाली. श्री चंद्रशेखर उपाख्य अप्पासाहेब लंगडे यांनी श्रीगणेश वंदना व दीप प्रज्वलन प्रसंगी मंत्रोच्चारणाने कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात झाली. सोसायटीचे अध्यक्ष नागपूरकर, उपाध्यक्षा सौ सुषमा कदम व सचिव श्री भागवत व सहसचिव श्री आशुतोष देशपांडे यांनी आयडीबीआय बँकेचे सातारा एक व दोन या प्रादेशिक कार्यालयांचे विविध विभागप्रमुखांचा , आयडीबीआय आरसेटीचे संचालक श्री रासकर , श्री गणेश भोसले , श्री सतीश शिंदे तसेच सेवानिवृत्त संघटनेचे श्री अनिल बेलागडे, कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी श्री लोहार, श्री नामदेव गायकवाड, श्री सुशांत धोत्रे व श्री शिंदे त्याचप्रमाणे विमामहर्षी सोसायटीचे सदस्य माजी अध्यक्ष श्री सुनील खटावकर व सहकार भारतीचे प्रांतप्रमुख व सोसायटीचे माजी उपाध्यक्ष श्री प्रविण देशपांडे , श्री चंद्रशेखर लंगडे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

सचिव श्री प्रसाद भागवत यांनी सभेचे प्रास्ताविक व सोसायटीचा मागील वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून सभेची मान्यता घेतली. त्यानंतर अध्यक्ष श्री नागपूरकर यांनी यावर्षीच्या अहवालाचे वाचन करतानाच सोसायटीची प्रगती, विविध उपक्रम व अहवाल छपाई याबाबत विस्तृत विवेचन केले.









विमामहर्षी अण्णासाहेब चिरमुले क्रेडिट को-ऑप सोसायटी, साताराच्या ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत रोलर स्केटिंगपटू चि प्रद्युत सायली सूरज जाधव, सत्कारमूर्ती सह अध्यक्ष श्री दत्तात्रय नागपूरकर, उपाध्यक्षा सौ सुषमा गडकरी व सचिव श्री प्रसाद भागवत व सर्व संचालक मंडळ

आपल्या भाषणात अध्यक्षांनी संस्थेला झालेला नफा, वाढलेला व्यवसाय, वाढलेली सभासद संख्या यांचा आढावा घेऊन व्यवस्थापन कमिटीने यावर्षी महाराष्ट्र राज्य सहकार खाते यांच्या नियमानुसार अधिकतम १५% लाभांश जाहीर केला व सभेला या प्रस्तावास मान्यता देण्याची विनंती केली. त्याप्रमाणे एकमताने हा नफावाटप प्रस्ताव मंजूर झाल्याने सर्व सभासदांनी आनंद व्यक्त केला. यावेळी संस्थेचे सभासद श्री राहुल मदने यांनी लाभांशाव्यतिरिक्त संस्थेने सभासदांना वैद्यकीय मदत अथवा अन्य रुपाने सभासद कल्याण निधीतून रु एक हजार फक्त किंवा संस्थेस शक्य असेल ती अतिरिक्त रक्कम द्यावी , अशी सूचना मांडली. संचालक श्री सचिन बेंद्रे यांनी अहवालातील विविध तरतुदींचा आढावा घेऊन या प्रस्तावास अनुमोदन दिले. त्यानंतर संचालक मंडळाने यावर विचारविमर्श करून अध्यक्ष श्री नागपूरकर यांनी यावर्षीसाठी व ३१/०३/२०२६ रोजी संस्थेचे सभासद असलेल्या सर्व सभासदांना रु एक हजार फक्त वैद्यकीय मदत जाहीर केली व लाभांशाबरोबरच ही रक्कम वितरित करण्यात येणार असल्याचे सांगितले. यानंतर मागील वर्षीचा जमा खर्च व ताळेबंद यांचे वाचन, त्यावरील विविध आकडेवारी बाबत सभागृहात सविस्तर चर्चा झाली.त्यात बहुतेक सभासदांनी सहभाग घेतला. संस्थेच्या सभासदवाढीसाठी प्रयत्न करण्याबद्दल सुद्धा सविस्तर चर्चा झाली. या वार्षिक सर्वसाधारण सभेत विशेष उल्लेखनीय म्हणजे संस्थेचे विद्यमान संचालक श्री आशुतोष देशपांडे यांचा एकवीस किमीची ‘सातारा हाफ हिल मॅरेथॉन’ स्पर्धा आतापर्यंत पाच वेळा पूर्ण केल्याबद्दल, ‘निमा मॅरेथॉन’ स्पर्धेत यशस्वी सहभाग आणि "I AM 10 KIMI धुरणधर’ ही स्पर्धा विक्रमी कमी वेळात पूर्ण केल्याबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ, सन्मान चिन्ह व पेढेपुडा देऊन सत्कार केला. त्याचबरोबर संस्थेचे सभासद श्री नामदेव गायकवाड यांचा सात वर्षीय नातू चि प्रद्युत सायली सूरज जाधव याचा त्याच्या ‘रोलर स्केटिंग’ मधील राज्यपातळी व देशपातळीवरील अद्वितीय कामगिरी व विश्वविक्रमाकडे चाललेल्या वाटचालीबद्दल पुष्पगुच्छ, व पेढेपुडा देऊन सत्कार करण्यात आला. या दोन्ही सत्कारांच्या नूतन उपक्रमाला उपस्थित सर्व सभासदांनी प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात, मनापासून दाद दिली.

सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस पुणे झोनल ऑफिसचे झोनल मॅनेजर व मुख्य महाप्रबंधक श्री आशुतोष कुमार, मुंबई कार्यालयातील मुख्य महाप्रबंधक श्री राजन शुक्ला, महाप्रबंधक श्री श्रीनिवास बागलकोट, श्री प्रसाद कुलकर्णी, पुण्याचे डेप्युटी झोनल मॅनेजर श्री अजय रानडे, सातारा प्रादेशिक महाव्यवस्थापक श्री निलेश जाधव व श्री सुब्रमण्यम, पुणे प्रादेशिक महाव्यवस्थापक श्री धनेश चौधरी व श्री सिद्धार्थकुमार, कोल्हापूर प्रादेशिक महाव्यवस्थापक श्री रंजन , गोव्याचे प्रादेशिक महाव्यवस्थापक श्री सुभेदार, पनवेलचे प्रादेशिक महाव्यवस्थापक श्री विक्रम भिडे तसेच माजी महाव्यवस्थापक सर्वश्री भालचंद्र परांजपे, रत्नाकर तांदळे, एस व्ही क्षीरसागर, राजेश शिवरकर, संजीव गोखले आणि युनायटेड वेस्टर्न आयडीबीआय बँक सेवानिवृत्त संघाचे अध्यक्ष श्री अनंतराव कुलकर्णी यांनी शुभेच्छा संदेश पाठवले होते. या संदेशांचे श्री चंद्रशेखर उपाख्य अप्पासाहेब लंगडे यांनी वाचन केले. उपस्थित सभासदांपैकी श्री प्रविण देशपांडे, श्री लोहार, श्री सुहास धारणे, श्री सतिश शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करून संस्थेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या. संचालिका सौ दिपाली खडके व संचालक श्री सचिन बेंद्रे यांनी संस्थेच्या आगामी उपक्रमांबद्दल सभासदांना माहिती देऊन सर्वांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. आभार प्रदर्शन संचालक सचिव श्री प्रसाद भागवत यांनी केले. उपाध्यक्ष सौ सुषमा गडकरी व संचालिका सौ निलाक्षी देशपांडे यांनी केले. सुग्रास भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. विमामहर्षी अण्णासाहेब चिरमुले सोसायटीची पासष्टावी वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# मनपा शाळांतील नववी-दहावीच्या विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तकांचे वितरण

## बालभारतीकडून पुस्तके उपलब्ध होताच १७ माध्यमिक शाळांना तत्काळ पुरवठा

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. महानगरपालिकेच्या निधीतून या विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तकांची व्यवस्था करण्यात आली असून, बालभारतीकडून पुस्तके उपलब्ध होताच ती तातडीने मनपाच्या १७ माध्यमिक शाळांना वितरित करण्यात आली आहेत.

महानगरपालिकेच्या शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शासन स्तरावरून पाठ्यपुस्तकांचा पुरवठा केला जातो. तर इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी महानगरपालिकेच्या निधीतून पाठ्यपुस्तके उपलब्ध करून दिली जातात.

यावर्षी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला इयत्ता नववी व दहावीची नवीन पाठ्यपुस्तके बालभारतीकडे उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी मनपा शाळांमध्ये गतवर्षीची पाठ्यपुस्तके शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ दिले नाही.

दरम्यान, बालभारतीकडे इयत्ता नववी व दहावीची पाठ्यपुस्तके शनिवार, दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी उपलब्ध झाली. त्यानंतर महानगरपालिका शिक्षण विभागाने विलंब न करता ही पुस्तके बालभारतीकडून हस्तगत केली आणि तत्काळ मनपाच्या सर्व १७ माध्यमिक शाळांना वितरित केली. त्यामुळे विद्यार्थ्यांना आता नवीन पाठ्यपुस्तके उपलब्ध झाली असून, त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला अधिक गती मिळणार आहे. ही कार्यवाही मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



पाठ्यपुस्तकांची उपलब्धता, हस्तांतरण आणि शाळानिहाय वितरणाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित केंद्रस्थानी ठेवून आवश्यक शैक्षणिक साहित्य वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत.

# सदस्यत्व अपात्रता बाबत नऊ नगरसेवक, नगरसेविकांची सुनावणी संपन्न

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सदस्य विरोधात दोन पेक्षा अधिक अपत्य, अतिक्रमण, अनाधिकृत बांधकाम तसेच शहागंज येथील अतिक्रमणाला प्रोत्साहन देण्यासंदर्भात दाखल झालेले गुन्हे या बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० (१), १० (१-अ) नुसार सदस्यत्व अपात्रते बाबत टप्पेनिहाय सुनावण्या घेण्यात येत आहे.

यानिमित्त आज एकूण नऊ सदस्यांची सुनावणी आयुक्त अमोल येडगे यांनी घेतली. आज स. सदस्य फेरोज खान (दोन पेक्षा अधिक अपत्य), शेख नरगीस सलीम (दोन पेक्षा अधिक अपत्य), मोहम्मद वसीम (दोन पेक्षा अधिक अपत्य), मोहम्मद वाजेद (अतिक्रमणला प्रोत्साहन दिल्यास गुन्हा दाखल), मेराज खान (अतिक्रमणाला प्रोत्साहन गुन्हा दाखल), सय्यद सोहेल (अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम), अब्दुल समीर (अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम), भारती सोनवणे (अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम), हिवराळे जिवकपाल (अतिक्रमण /अनधिकृत बांधकाम) यांची सुनावणी घेण्यात आली.

याच विषयी दिनांक १७ ऑगस्ट २०२६ रोजी संपन्न झालेली सुनावणीत खालील प्रमाणे सदस्यांची सुनावणी घेण्यात आली; अभिजीत जीवनवाल (अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम), गणेश नावंदर (अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम), नुर जहान इकबाल (अतिक्रमण / अनाधिकृत बांधकाम), फिरोज खान (अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम), खान अब्दुल मतीन (अतिक्रमणास प्रोत्साहन गुन्हा दाखल), मोहम्मद वसीम (अतिक्रमण प्रोत्साहन गुन्हा दाखल), सय्यद सोहेल (अतिक्रमणास प्रोत्साहन गुन्हा दाखल), मेराज खान (दोन पेक्षा अधिक अपत्य असल्याबाबत ) आणि मुंशी भिकन शेख (दोन पेक्षा अधिक अपत्य असल्याबाबत) तसेच आगामी ०७ सप्टेंबर २०२६ रोजी एकूण नौ सदस्यांची सुनावणी घेण्यात येणार आहे तसेच १५ सप्टेंबर २०२६ रोजी एकूण ११ सदस्यांची सुनावणी घेण्यात येणार आहे.

सुनवणी झालेल्या सदस्यांनी मागणी केल्यानुसार त्यांना म्हणणे मांडण्यासाठी वेळ वाढवून मिळावी अशी मागणी होती त्यानुसार त्यांना पुढील तारीख लेखी कळविण्यात येईल, अशी माहिती महानगरपालिका निवडणूक विभागातर्फे देण्यात आली आहे.

# शेंद्रा येथे आज 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि श्ध्ब्ज्ञ कौशल्य विकास केंद्र, शेंद्रा यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. २५ ऑगस्ट रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी साडे नऊ वाजता **MIDC** कौशल्य विकास केंद्र, शेंद्रा, जि. छत्रपती संभाजीनगर येथे हा मेळावा होणार आहे, असे सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सुरेश बहुरे यांनी कळविले आहे.

छत्रपती संभाजीनगर तसेच पुणे येथील विविध नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी मेळाव्यास उपस्थित राहून उमेदवारांच्या मुलाखती घेणार आहेत. या मेळाव्यात विविध १७ आस्थापनांकडून १ हजार २८९ रिक्तपदांसाठी प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येणार आहेत.

एनव्हिरो डेव्हलपमेंट सोल्यूशन, चंद्रिकला इंजिनिअरिंग प्रा. लि., रुचा इंजिनिअरिंग, बजाज इलेक्ट्रिकल्स, इंसेफ सर्व्हिसेस प्रा. लि., फोर्ब्स प्रिसिजन टूल्स प्रा. लि., बी. जी. इलेक्ट्रिकल्स अँड इलेक्ट्रॉनिक्स, डिस्टील एज्युकेशन अँड टेक्नॉलॉजी प्रा. लि., नेक्सलिड कन्सल्टिंग एलएलपी, लेबरनेट इंडिया सर्व्हिसेस प्रा. लि., बजाज ऑटो लि., परकिन्स इंडिया प्रा. लि., भारत फोर्ज लि., पुणे, व्हॅलिओ इंडिया प्रा. लि., पुणे, एम. जी. कॉर्पोरेशन, स्टरलाइट टेक्नॉलॉजी लि. आणि नायडेक ग्लोबल अप्लायन्स या १७ आस्थापनांकडून एकूण १ हजार २८९ रिक्तपदे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

या पदांसाठी कोणत्याही शाखेची पदवी, अभियांत्रिकी पदवी, पदविका, आयटीआय, बारावी तसेच दहावी उत्तीर्ण अशा विविध शैक्षणिक पात्रताधारक युवक-युवतींना त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेनुसार रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

मेळाव्यात सहभागी होण्यासाठी रोजगार नोंदणी असलेल्या उमेदवारांनी महास्वयं रोजगार www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर युजर आयडी व पासवर्डच्या माध्यमातून लॉग इन करून ऑनलाइन अर्ज करावा. तसेच आपल्या बायोडाटाच्या १५ प्रती घेऊन प्रत्यक्ष मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहून मुलाखतीमध्ये सहभागी व्हावे. संकेतस्थळावर नोंदणी करताना अथवा रिक्तपदांसाठी अर्ज करताना अडचण आल्यास दूरध्वनी क्रमांक ०२४०-२९५४८५९ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. उपलब्ध संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि MIDC कौशल्य विकास केंद्र, शेंद्रा यांनी केले आहे.

# 'बामू'ला पहिल्यांदाच 'आविष्कार'चे यजमानपद

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मुकुटात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. महाराष्ट्र राजभवनाच्या (लोकभवन) वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित 'राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवा'चे यजमानपद पहिल्यांदाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला मिळाले आहे. गेल्या २० वर्षांच्या इतिहासात या स्पर्धेचे आयोजन करण्याची संधी या विद्यापीठाला प्रथमच मिळाली आहे.

येत्या १६ ते १९ जानेवारी २०२७ दरम्यान हा भव्य महोत्सव रंगणार असून, यामध्ये महाराष्ट्रातील २६ विद्यापीठांमधील सुमारे १,५०० नवसंशोधक व विद्यार्थी सहभागी होणार आहेत, अशी अधिकृत माहिती विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे यांनी दिली.

विद्यार्थ्यांमधील नावीन्यपूर्ण संशोधन, कल्पकता आणि नवोन्मेष वृत्तीला चालना देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल एस. एम. कृष्णा यांनी २००६ मध्ये 'आविष्कार' स्पर्धेची सुरुवात केली होती.

या संदर्भात २ जुलै २०२६ रोजी राजभवनात राज्यातील सर्व विद्यापीठांची एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने यजमानपदाचा प्रस्ताव सादर केला होता. महाराष्ट्राचे राज्यपाल तथा राज्य विद्यापीठांचे कुलपती जिष्णू देव वर्मा यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली असून, यजमान विद्यापीठ म्हणून मराठवाडा विद्यापीठाच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.

# डासांच्या नियंत्रणासाठी मनपाची 'धडक गप्पी मासे मोहीम'; १० झोनमध्ये ५१२ ठिकाणी गप्पी मासे सोडले

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- महानगरपालिकेचे महापौर समीर राजुरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, सभापती स्थायी समिती अनिल मकरिये, विरोधी पक्षनेता समीर साजिद, सभागृह नेता गोविंद केंद्रे, सभापती वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती डॉ. सुनीता सोळुंके, आयुक्त अमोल येडगे तसेच अति. आयुक्त - २ कल्पिता पिंपळे यांच्या आदेशानुसार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जीवशास्त्रवेत्ता व साथरोग अधिकारी डॉ. सय्यद सुमैय्या नाज यांच्या अधिपत्याखाली ही मोहीम शहरातील सर्व १० झोनमध्ये व्यापक स्वरूपात राबविण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आरोग्य मलेरिया विभागामार्फत डासजन्य आजारांना प्रतिबंध करण्यासाठी 'धडक गप्पी मासे मोहीम' प्रभावीपणे राबविण्यात आली. दिनांक १९ ऑगस्ट २०२६ ते २४ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आरोग्य मलेरिया विभागाच्या वतीने सर्व झोन क्रमांक १ ते १० मध्ये ही विशेष मोहीम राबविण्यात आली.

डेंग्यू, मलेरिया यांसारख्या डासजन्य आजारांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावी करण्यासाठी तसेच डासांच्या अळ्यांचे जैविक पद्धतीने नियंत्रण करण्याच्या उद्देशाने या मोहिमेअंतर्गत विविध ठिकाणी नवीन गप्पी मासे सोडण्यात आले.

मोहिमेदरम्यान झोन क्रमांक १ ते १० मध्ये एकूण ५१२ ठिकाणी गप्पी मासे सोडण्यात आले. गप्पी मासे हे डासांच्या अळ्या खाणारे उपयुक्त जैविक घटक असून, त्यांच्या माध्यमातून डासांच्या उत्पत्तीवर नैसर्गिक पद्धतीने नियंत्रण ठेवण्यास मदत होते. त्यामुळे 'गप्पी मासे – जैविक डास नियंत्रणाचे प्रभावी अस्त्र' या संकल्पनेतून महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने हा उपक्रम राबविला आहे.

**नागरिकांना आवाहन**

डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी नागरिकांनी आपल्या घराभोवती व परिसरात पाणी साचू देऊ नये. पाण्याच्या साठ्यांची नियमित स्वच्छता करावी तसेच महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांना सहकार्य करावे.

'डासांची उत्पत्ती रोखा – डेंग्यू व मलेरियाला आळा घाला' या उद्देशाने महानगरपालिका आणि नागरिकांच्या संयुक्त प्रयत्नातून डासमुक्त, निरोगी व सुरक्षित छत्रपती संभाजीनगर घडविण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

टीप :- गप्पी मासे हवे असल्यास नागरिकांनी आपल्या जवळील मनपा आरोग्य केंद्रातील बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी यांच्याकडे नाव, मोबाईल नंबर व पत्ता नोंदविणे.

# मनपा वृक्ष प्राधिकरण समितीच्या तीन सदस्यांच्या नियुक्तीसाठी अर्ज मागविले

## वृक्षारोपण, संवर्धन व पर्यावरण क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींना संधी; ४ सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका स्तरावरील वृक्ष प्राधिकरण समितीचे पुनर्गठन करण्यात येणार असून, समितीवर नामनिर्देशित करण्यात येणाऱ्या तीन सदस्यांच्या नियुक्तीसाठी पात्र व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

नागरी क्षेत्रातील वृक्षसंरक्षण व जतनासाठी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ तसेच महाराष्ट्र शासनाच्या दि. १६ जुलै २०२१ रोजीच्या अधिसूचनेनुसार ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

शासनाद्वारे वेळोवेळी अधिसूचित करण्यात येणाऱ्या किमान कालावधीसाठी झाडांची लागवड, रोपण, जतन व संवर्धन यामध्ये अनुभव असलेल्या बिनसरकारी संघटनांसह सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांपैकी तज्ज्ञ व्यक्तींची वृक्ष प्राधिकरण समितीवर नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे.

**या करिता पुढील निकषानुसार**

समितीच्या सदस्यपदासाठी अर्ज करणारी व्यक्ती कोणत्याही शासकीय, निमशासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदावर कार्यरत नसावी. तसेच बिनसरकारी संस्थेच्या प्रतिनिधी म्हणून नियुक्ती होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीचे शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडे नोंदणीकृत बिनसरकारी संस्थेचे सक्रिय सदस्य असणे आवश्यक आहे.

कृषी, वन किंवा उद्यान विभागातील सेवानिवृत्त वर्ग-१ व वर्ग-२ अधिकाऱ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. याशिवाय वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, पुनर्रोपण किंवा पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील विशेष ज्ञान व किमान पाच वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या व्यक्तींनाही अर्ज करता येणार आहे. समितीच्या सदस्यांना कोणतेही मानधन अथवा भत्ता देय राहणार नसून, समितीचा कार्यकाळ महासभेचा कार्यकाळ असेपर्यंत राहणार आहे. तसेच समिती किंवा वृक्ष प्राधिकरणाच्या निर्णयाधीन बाबींमध्ये आयुक्त तथा अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण यांचा निर्णय अंतिम राहील.

**४ सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन**

वरील पात्रता धारण करणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी दि. ४ सप्टेंबर २०२६ पर्यंत आपला सविस्तर अर्ज मुख्य उद्यान अधिकारी, सिद्धार्थ उद्यान, छत्रपती संभाजीनगर येथे सादर करावा. अर्जासोबत Curriculum Vitae (CV) व संबंधित कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

प्राप्त अर्जांची छाननी करून वृक्ष प्राधिकरण समितीवर तीन सदस्य नामनिर्देशित/नियुक्त करण्याचा अधिकार महानगरपालिका आयुक्त तथा वृक्ष प्राधिकरण समितीचे अध्यक्ष यांच्याकडे राहणार आहे.


महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सूचना**

निम्नस्वाक्षरीकारांकडून पुढील कामासाठी अनुभवी व नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई निविदा मागवण्यात येत आहे ई- निविदा क्र. EE/CSUDN-II/T-26/2026-27 (Work Contract for Transportation of Distribution Transformers including loading & unloading of T/F from Filter unit, Pannalalnagar to Transformer repairing agency & Vice Versa under the jurisdiction of Urban Division- II, Chh. Sambhajinagar. रु ५ लाख) EE / CSUDN-II / T-27 / 2026-27 (Work Contract for Transportation, Loading, Unloading of Equipments & Material including scrap material under MSEDCL Urban Division-II Chh. Sambhajinagar. ५ लाख) छत्रपती संभाजीनगर क्र-२ विभागातील निविदा विक्री कालावधी दि २४.०८.२०२६ ते २७.०८.२०२६. निविदा भरण्याची शेवटची तारीख दि. २७.०८.२०२६ पर्यंत. रोजी १५.०० वाजेपर्यंत अधिक माहिती करिता संकेतस्थळ http://works.mahadiscom.in/eTender/etender

PRO No. CSZ/118/2026-27. कार्यकारी अभियंता (छ.सं.वि. क्र. ।।)


## (पान १ वरुन)

### आता मागे हटणार नाही, २९ ऑगस्टला...

२८ ऑगस्टच्या आतमध्ये सरकारनं द्यावी अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली आहे. आता आंदोलन थांबणार नाही, २९ ऑगस्टला आंदोलन होणार असल्याचे पाटील म्हणाले. मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे सवलतीबाबतचा निर्णय २८ ऑगस्टच्या आत लागू करा असी मागणी जरांगे पाटील यांनी केली. मराठा आंदोलकावरील केसेस मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण करा सांगितले आहे. बलिदान दिलेल्या बांधवांचा निधीचा विषय राहिला आहे, तो पूर्ण करा असेही सांगितले आहे. विशेष म्हणजे सातारा पुणे, बॉम्बे औध गॅझेटर संबंधीचा जी आरची मागणी आहे, ती पूर्ण करा असेही सांगितल्याचे जरांगे म्हणाले. ज्यांचे प्रमाणपत्र, व्हॉलिडिटी राहिली असेल त्यांनी २८ ऑगस्टला अंतरवाली मध्ये यावं असं आवाहन देखील जरांगेंनी केलं.

### कांदिवलीत मराठी रिक्षाचालकाला अमराठी..

चालकांनी तीन दिवस बंदची हाक दिली आहे. परप्रांतीय रिक्षा चालकांनी रस्त्यावरन उतरुन आंदोलन केले. "आम्ही ५० ६० वर्षांचे वृद्ध आहोत, आम्ही शाळेत देखील गेलो नाही. मराठी कसे बोलणार? आम्ही शिकलो असतो तर आज ऑफिसमध्ये बसलो असतो. मोडकी तोडकी मराठी बोलायचा प्रयत्न करतोय तरी देखील आमच्याकडून दंड घेतला जात आहे. आम्ही १५ ते २० हजार दंड देऊ शकतो का? आम्ही तीन दिवस बंद पाळू, जोपर्यंत न्याय मिळत नाही", असे परप्रांतीय रिक्षा चालक एएनआयशी बोलताना म्हणाले.

परप्रांतीय रिक्षा चालकांनी मराठी सक्तीला विरोध दर्शवत बंद पुकारला असल्याचे सांगितले. "आमचे म्हणणे कोणी ऐकत नाहीये, ६० वर्षांचे वृद्ध अचानक मराठी कसे बोलतील, आम्हाला न्याय हवाय", असे परप्रांतीय म्हणाले. तसेच, काही परप्रांतीय रिक्षा चालकांनी, "आम्ही भोजपुरी, हिंदी बोलू पण मराठी बोलणार नाही", अशी भूमिका घेतली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याप्रकरणी बोलताना, "मुजोरी केल्यास मोडून काढू", अशा इशारा दिला आहे.

### राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढणार;...

२४ ऑगस्टपासून २५ ऑगस्टपर्यंत काही भागांत पावसाचा जोर वाढू शकतो. विदर्भात काही ठिकाणी जोरदार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता असून, पश्चिम महाराष्ट्रातील घाटमाथ्यावरही पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. याशिवाय काही भागांत पावसासोबत मेघगर्जना आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील पुणे आणि सातारा जिल्ह्यांच्या घाटमाथ्याला पावसाचा विशेष इशारा देण्यात आला आहे. घाट परिसरात आधीच मोठ्या प्रमाणात पाऊस झालेला असताना पुन्हा जोरदार सरींचा अंदाज असल्याने या भागातील नदी-नाले, धबधबे आणि घाटरस्त्यांवर परिस्थितीवर लक्ष ठेवण्याची गरज आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्रातील अनेक भागांत हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी पावसाच्या जोरदार सरीही कोसळू शकतात.

विदर्भासाठी पुढील काही दिवस तुलनेने महत्त्वाचे ठरणार आहेत. २४ ऑगस्ट रोजी विदर्भातील काही भागांत जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. पूर्व विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असल्याने स्थानिक प्रशासन आणि नागरिकांनी हवामान विभागाच्या सूचनांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

राज्यातील इतर भागांच्या तुलनेत मराठवाड्यात पावसाची स्थिती अद्याप चिंतेची आहे. काही भागांत अधूनमधून पाऊस होत असला तरी अनेक ठिकाणी मोठ्या पावसाची प्रतीक्षा कायम आहे. पावसाचा खंड आणखी वाढल्यास खरीप पिकांना पाण्याची कमतरता जाणवू शकते. त्याचबरोबर आगामी काळात पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी आणि चारा यांचे नियोजनही महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत होणारा पाऊस मराठवाड्यासाठीही निर्णायक ठरू शकतो. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत हलका ते मध्यम पाऊस, तसेच काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज आहे.

### कुंभमेळ्याची ०.१टक्के रक्कम दिली असती,...

न्यायमूर्ती वराळे म्हणाले, 'सरकार विविध विकासकामांसाठी आणि उपक्रमांसाठी भरघोस निधी दिल्याचे दावे करते. उपमुख्यमंत्र्यांनी कुंभमेळ्यासाठी ३२,००० कोटी रुपये तर मुख्यमंत्र्यांनी ३४,००० कोटी रुपये खर्च करणार असल्याचे सांगितले आहे. तसेच एका कॉरिडॉर प्रकल्पासाठी ११,००० कोटी रुपये मंजूर झाल्याचे मी वाचले. सरकार हजारो कोटी रुपये खर्च करत आहे, याला माझा कोणताही आक्षेप नाही. मात्र, या हजारो कोटींपैकी केवळ ०.१ टक्के म्हणजे सुमारे ३२ कोटी रुपये जरी सरकारने शिक्षणासाठी दिले असते, तरी राज्यभरात बंद पडलेल्या १०० ते १२५ मराठी माध्यमाच्या शाळा नक्कीच वाचवता आल्या असत्या.'

वाढत्या विद्यार्थी संख्येच्या तुलनेत शिक्षणावरील तरतूद वाढवण्याऐवजी ती कमी केली जात असल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. 'केंद्राच्या पातळीवर शिक्षणासाठीचे बजेट पूर्वी ८ ते १२ टक्क्यांच्या आसपास असायचे. विद्यार्थ्यांची वाढती संख्या पाहता यात वाढ होणे अपेक्षित होते, मात्र गेल्या अनेक वर्षांत हा आकडा १३ टक्क्यांपर्यंतही पोहोचू शकलेला नाही,' याकडे त्यांनी लक्ष वेधले.

### कॉक्रोच जनता पार्टीचा दिल्लीत ५ सप्टेंबरला शांतता...

नीट परीक्षा रद्द झाल्याने आत्महत्या केलेल्या मुलांचे आई वडील, २० जुलैला ज्यांनी ज्यांनी पोलिसांच्या लाठ्या खाल्ल्या ते सगळेजण या शांतता मोर्चात सहभागी होणार आहेत असंही सीजेपीने स्पष्ट केलं आहे.

नीटच्या पेपरफुटीनंतर विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरु झालं होतं. सीजेपी अर्थात कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वात हे आंदोलन सुरु होतं. धर्मेंद्र प्रधान यांनी नीट पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला पाहिजे अशी प्रमुख मागणी होती. २० जुलैला या विद्यार्थ्यांनी संसद मार्चही काढला होता. ज्यावर लाठीचार्ज करण्यात आला. यानंतर २५ जुलैला आंदोलक विद्यार्थ्यांवरचे गुन्हे मागे घेतले जातील ही मागणीही मान्य करण्यात आली होती. तसंच धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्याने या आंदोलनाला मोठं यश मिळालं होतं त्यामुळे हे आंदोलन मागे घेण्यात आलं. आता अजूनही गुन्हे मागे घेण्यात आलेले नाहीत त्यामुळे सीजेपीने शांतता मोर्चा काढणार असल्याची घोषणा केली आहे.

### राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या पारितोषिकांच्या रकमेत भरीव वाढ

संस्थेकडे १ हजार १३८ खाटांचे सूसज्ज रुग्णालय आहे. तर अहिल्यानगर येथे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन या संस्थेने असे विद्यापीठ स्थापनेचा प्रस्ताव दिला होता. या विद्यापीठाकडे वैद्यक विद्याशाखेतील पदवी, पदव्युत्तर आणि सुपर स्पेशालिटी अभ्यासक्रम शिकवण्याची व्यवस्था आहे. तसेच सर्व सुविधांनी युक्त असे ८३० खाटांचे रुग्णालय देखील आहे.


**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड**
(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

Truhome FINANCE

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८ **मुख्य कार्यालय.** लेव्हल ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी-२ ब्लॉक,वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ **वेबसाइट:** www.truhomefinance.in

**प्रतिकात्मक ताबा सूचना**

ज्याअर्थी, खाली सही करणारे अधिकारी हे ट्रूहॉम फायनान्स लिमिटेड (पूर्वीचे श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांचे अधिकृत अधिकारी असून, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ ("उक्त अधिनियम") च्या तरतुदींनुसार तसेच उक्त अधिनियमाच्या कलम १३(१२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ ("उक्त नियम") मधील नियम ३ सह वाचून, खालील तक्त्यामध्ये तपशील नमूद केलेल्या कर्जदारांना उक्त मागणी सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम परतफेड करण्यासाठी मागणी सूचना जारी केल्या आहेत.
कर्जदारांनी सदर रकमेची परतफेड करण्यात अपयशी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदारांना तसेच सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, खाली सही करणारे ट्रूहॉम फायनान्स लिमिटेड (पूर्वीचे श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांचे अधिकृत अधिकारी यांनी उक्त अधिनियमाच्या कलम १३(४) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि उक्त नियमांच्या नियम ८ सह वाचून, खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.कर्जदारास विशेषतः आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सावध करण्यात येते की, सदर मालमत्तेशी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. सदर मालमत्तेशी करण्यात येणारा कोणताही व्यवहार हा ट्रूहॉम फायनान्स लिमिटेड (पूर्वीचे श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांच्या खाली नमूद केलेल्या रकमेवरील तसेच त्यावरील व्याजासह असलेल्या हक्कभाराच्या अधीन राहील.कर्जदाराचे लक्ष उक्त अधिनियमाच्या कलम १३ मधील उपकलम (८) मधील तरतुदींकडे वेधण्यात येत आहे, ज्यामध्ये सुरक्षित मालमत्ता विमोचित करण्यासाठी उपलब्ध असलेल्या कालावधीबाबत तरतूद करण्यात आलेली आहे.

| कर्जदाराचे नाव व पत्ता |
| --- |
| **१) श्री. सचिन वीरेश तम्मल (कर्जदार)२) सौ. मीनाक्षी सचिन तम्मल (सह-कर्जदार) सर्वजण राहणार:सध्याचा पत्ता: घर नं. २/१६/५०, माटे निवास, फकीरवाडी, मारुती मंदिराजवळ, औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत - ४३१००१. तसेच येथे:शॉप नं. १२, जेठिया टॉवर, गुलमंडी, औरंगाबाद बुक डेपोच्या बाजूला, औरंगाबाद, महाराष्ट्र - ४३१००१. मालमत्तेचा पत्ता:गुंठेवारी प्लॉट नं. ३० वर बांधलेले घर, प्लॉट क्षेत्रफळ ८१०.०० चौ.फु. व बांधकाम क्षेत्रफळ १४००.०० चौ.फु., सी.टी.एस. नं. १५८४३/भाग, शीट नं. २८३/अ, सर्व्हे नं. १३, मौजे शहानूरवाडी, ता. व जि. छत्रपती संभाजीनगर - ४३१००१** |
| **थकबाकी रक्कम** |
| मागणी सूचना रक्कम :दिनांक ११-०५-२०२६ रोजी कर्ज खाते क्रमांक SHLHAURD0001189 च्या संदर्भात रु. ६५,६१,२३३/- (फक्त पासष्ट लाख एकसष्ट हजार दोनशे तेहतीस रुपये) आणि कर्ज खाते क्रमांक TTUHAURD0001627 च्या संदर्भात रु. ९,२६,९९१/- (फक्त नऊ लाख सव्वीस हजार नऊशे एक्याण्णव रुपये) इतकी रक्कम देय आहे. सदर नोटीस प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, करारानुसार लागू असलेल्या दराने पुढील व्याजासह सदर रक्कम अदा करावी. मागणी सूचना तारीख: १३/०५/२०२६ प्रतिकात्मक ताबा मिळाल्याची तारीख: २१/०८/२०२६. |
| **मालमत्तेचे वर्णन** |
| सर्व्हे नं. १३, सी.टी.एस. नं. १५८४३/भाग, शीट नं. २८३/अ वर स्थित गुंठेवारी प्लॉट नं. ३०, प्लॉट क्षेत्रफळ ८१०.०० चौ.फु. व बांधकाम क्षेत्रफळ १४००.०० चौ.फु. असलेल्या बांधलेल्या घराची संपूर्ण मिळकत, मौजे शहानूरवाडी, ता. व जि. छत्रपती संभाजीनगर येथे स्थित आहे.सदर मिळकतीच्या चतु:सीमा : पूर्व: ०३.०० फूट रुंदीची गल्लीपश्चिम: ५०.०० फूट रुंदीचा रस्ता दक्षिण: प्लॉट नं. २९उत्तर: प्लॉट नं. ३१. |

ठिकाण - छत्रपती संभाजीनगर स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
दिनांक : २५-०८-२०२६ ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)